दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २४९ I सोमवार २२ जून २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com





## सहजयोग

आता पुष्कळांचं अस म्हणणं आहे कि मेडिकल सायन्स मध्ये कुंडलिनी हा शब्द नाही . मेडिकल सायन्स मध्ये पुष्कळ शब्द नव्हते ते आज आले आहेत आणि आता पुढे कुंडलिनी हा शब्द सुध्दा येईल . आणि आपल्याला आश्चर्य वाटेल कि दिल्लीला तीन डॉक्टर्स ना एम डी ची पदवी सहजयोगात मिळाली. आणि त्यांनी अशे रोग ज्याला आपण दमा म्हणतो ,किंवा ज्याला आपण एपिलेप्सी म्हणतो त्याच प्रकारे शारीरिक सुधृडता या विषया वरती ह्या लोकांनी प्रबंध केले आणि ह्या लोकांना यात एम डी ची पदवी मिळाली . हि जी एम डी ची पदवी मिळते त्याला परीक्षक सुध्दा त्याच्याही पेक्षा उच्च प्रतीचे असले पाहिजेत . आणि त्यांनी मेडिकलच परिमाण धरूनच ,त्यांनी काही हवेत केलं नाही ,मेडिकलच्याच परिमाणाने सिध्द केलं कि कुंडलिनीच जागरण जे आहे हे पॅरासिम्फथेटिक नर्व्हस सिस्टम म्हणून जी आपल्या मध्य मार्गातील , सुषुम्ना नाडीतील जी शक्ती आहे त्या शक्तीला अलौकिक करते . तसेच इंगलंड ला सुध्दा आपल्याला आश्चर्य वाटेल कि साठ डॉक्टर्स याच्यावर खूप काम करत आहेत . आणि ज्या ज्या लोकांना याने बर वाटलंय ते त्यांनी सगळं नमूद करून ठेवल आहे हे तर अगदी तसेच झाले, की जेव्हा आपण बाग लावतो, तेव्हा सुरुवातीला मध्येच थोडे थोडे अंकुर खूप मुश्कीलतेने येतात. कारण अजून जमीन नीट झालेली नसते, अजून त्यात खूप मेहनत करण्याची गरज असते. कलियुगात कोणी परमात्म्याचा विचार जरी केला, तरी तीच एक मोठी तपश्चर्या आहे. या योगाला, या युनियनला (मीलन), या परमात्म्याशी होणाऱ्या मिलनाला त्याने प्राप्त करावे. या आत्मसाक्षात्काराला, या 'सेल्फ अॅक्चुअलायझेशन'ला (Self-actualization) त्याने अनुभवावे.१० डिसेंबर १९९०, रयत शिक्षण संस्था,लोणी

अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191

सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## महत्त्वाचे..

### नांदेड गुरुद्वाराचा कारभार नव्या कायद्यानुसार १९५६ चा जुना कायदा रद्द !

मुंबई : नांदेड येथील जगप्रसिद्ध 'दि नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहीब' चा कारभार आता काळाच्या ओघात अधिक सक्षम आणि गतिमान होणार आहे. या गुरुद्वारासाठी तब्बल ७० वर्षांपूर्वी म्हणजेच १९५६ मध्ये करण्यात आलेला कायदा रद्द करून, त्याऐवजी संपूर्ण नवीन कायदा लागू करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल विभागच्यावतीने हा प्रस्ताव सादर केला. त्याला मंत्रिमंडळाने मान्यता दिली. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, नांदेडच्या या गुरुद्वारामध्ये देश-विदेशातून येणाऱ्या दर्शनार्थींच्या संख्येत गेल्या काही वर्षांत प्रचंड वाढ झाली आहे.

# बहिष्कार सोडून चर्चेला या...

## उपमुख्यमंत्री शिंदे यांचे विरोधकांना आवाहन

- आज पासून विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन
- शेतकरी, महिला आणि विकासासाठी महायुती सरकारची विक्रमी कामगिरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** शेतकरी, महिला, कष्टकरी, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत महायुती सरकारने राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी विक्रमी निर्णय घेतले आहेत. कर्जमाफी, शेतकरी मदत, लाडकी बहीण योजना, उद्योग गुंतवणूक, मेट्रो, विमानतळ, महामार्ग, बंदरे आणि गृहनिर्माण यांसारख्या विविध क्षेत्रांत राज्याने मोठी झेप घेतली असून विरोधकांनी बहिष्काराचे राजकारण सोडून सभागृहात येऊन विधायक चर्चा करावी, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. याप्रसंगी त्यांच्या समवेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार उपस्थित होत्या.



आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या शुभेच्छा देताना शिंदे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योगाला जागतिक स्तरावर मान्यता मिळवून देत भारताचा सांस्कृतिक वारसा जगभर पोहोचवला आहे. योगामुळे आरोग्यदायी जीवनशैलीला चालना मिळाली असून प्रत्येकाने योग अंगीकारण्याची गरज आहे.

विरोधकांच्या भूमिकेवर भाष्य करताना शिंदे म्हणाले की, अधिवेशन हे राज्यातील जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करून त्यांना न्याय देण्यासाठी असते. मात्र विरोधी पक्षाने कायम बहिष्काराचे हत्यार वापरले आहे. इराण आणि अमेरिका यांच्यात संघर्ष सुरू असतानाही सीजफायर झाले, पण विरोधकांचा बहिष्कार काही संपत नाही, असा टोला त्यांनी लगावला. सरकार प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्यासाठी पूर्णपणे तयार असून विरोधकांनी सभागृहात येऊन चर्चा करावी, असे ते म्हणाले.

पावसाचे नियोजन, शेतकऱ्यांचे प्रश्न, विकासकामे आणि जनहिताचे विषय यावर सविस्तर चर्चा व्हावी, अशी सरकारची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकरी, पाऊस आणि विविध विषयांबाबतची सविस्तर आकडेवारी मांडली असून सरकारची भूमिका पारदर्शक असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या हितासाठी महायुती सरकारने घेतलेल्या निर्णयांचा उल्लेख करताना शिंदे म्हणाले की, राज्याच्या इतिहासात कधीही झाली नाही इतकी मदत महायुती सरकारने शेतकऱ्यांना दिली आहे. ३६ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी, २०२२ मध्ये १५ हजार कोटी रुपयांची मदत, तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्याचे काम महायुती सरकारने केले.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात प्रलंबित राहिलेल्या अनेक बाबींना न्याय देण्याचे काम आम्ही केले. शेतकऱ्यांना मदत करताना सरकारने कधीही हात आखडता(पान ४ वर)

### कर्जमाफी, बंडखोरी गाजणार.....

राज्य सरकारच्या अपयशी कारभाराविरोधात आणि जनतेच्या प्रश्नांबाबत सरकारच्या असंवेदनशील भूमिकेचा निषेध म्हणून महाविकास आघाडीने विधानमंडळ अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित करण्यात आलेल्या सरकारच्या चहापान कार्यक्रमावर बहिष्कार टाकल्याची घोषणा पत्रकार परिषदेत करण्यात आली. आज सोमवारपासून मुंबईत सुरू होत असलेल्या पावसाळी अधिवेशनात कर्जमाफी, कायदा आणि सुव्यवस्था, आमदार निधी यासह शिवसेना ठाकरे गटातील बंडखोरीवरून विरोधक सरकारला धारेवर धरणार आहेत.

# बिबट्याशी झुंज देत बापाने वाचविले मुलीचे प्राण!

### पळताना दोघेही विहिरीत पडले; ग्रामस्थांच्या तत्परतेमुळे दोघेही सुखरूप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अकोले :** तालुक्यातील डोंगरगावच्या गुंजाळ वस्तीवर शनिवारी रात्री घडलेल्या थरारक घटनेत एका चार वर्षीय बालिकेवर बिबट्याने हल्ला करून तिला जखमी केले. मात्र, वडील मनोज गुंजाळ यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता बिबट्याशी झुंज देत मुलीची सुटका केली. त्यानंतर जीव वाचविण्यासाठी धावत असताना अंधारामुळे बाप-लेकींचा तोल जाऊन ते खोल विहिरीत पडले. यात ग्रामस्थांच्या तत्परतेमुळे दोघांनाही सुखरूप बाहेर काढण्यात आले असून त्यांच्यावर सध्या संगमनेर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अवनी मनोज गुंजाळ असे जखमी बालिकेचे नाव आहे.

डोंगरगाव शिवारात शुक्रवारी रात्री ही अंगावर शहारे आणणारी घटना घडली. अवनी तिच्या आईसोबत असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक तिच्यावर झडप घातली. बिबट्याने अवनीला जबड्यात पकडून अंधाराच्या दिशेने ओढण्यास सुरुवात केली. मुलीच्या आईचा आरडाओरडा ऐकून जवळच असलेले वडील मनोज गुंजाळ



धावून आले. त्यांनी धाडसाने बिबट्याशी सामना करत मुलीची सुटका केली. जखमी अवस्थेतील अवनीला कडेवर घेऊन ते घराच्या दिशेने धावू लागले. मात्र, दाट अंधारामुळे वाटेत असलेल्या विहिरीचा अंदाज न आल्याने दोघेही विहिरीत पडले.

प्रसंगावधान राखत मनोज गुंजाळ यांनी मुलीला सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला. विहिरीत पडल्याचा आवाज आणि कुटुंबीयांचा आक्रोश ऐकून ग्रामस्थ घटनास्थळी धावले. त्यांनी दोघांनाही विहिरीतून बाहेर काढून (पान ४ वर)

# ऑपरेशन टायगर यशस्वी!

## ठाकरेंचे प्रयत्न निष्फळ; ओमराजेंची शिंदेसेनेत उडी

- धाराशिवमध्ये ठाकरे गटाला मोठा धक्का
- राणा जगजितसिंहांशी संघर्ष कायम ठेवणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**धाराशिव :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार ओम राजे निंबाळकर यांनी अखेर उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचा निर्णय जाहीर करत ठाकरे गटाला मोठा राजकीय धक्का दिला आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या भूमिकेबाबत सुरू असलेल्या तर्क-वितर्कांना पूर्णविराम देत त्यांनी आपल्या गोवर्धनवाडी येथील कार्यकर्त्यांच्या बैठकीत शिंदेसेनेत प्रवेश करण्याची घोषणा केली.

ओमराजे यांच्या बंडाची चर्चा गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात केंद्रस्थानी होती. त्यांना रोखण्यासाठी ठाकरे गटाच्या वरिष्ठ नेतृत्वाने प्रयत्नांची पराकाष्ठा केल्याची चर्चा होती. मात्र, अखेर ऑपरेशन टायगर यशस्वी ठरत ओमराजे यांनी शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला.

चार तास चाललेल्या बैठकीत कार्यकर्त्यांची मते जाणून घेतल्यानंतर आपण हा निर्णय घेतल्याचे ओम राजे यांनी स्पष्ट केले. सत्तेअभावी मतदारसंघातील जनतेची कामे होत नव्हती. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही अपेक्षित यश मिळाले नाही. कार्यकर्त्यांच्या भावना आणि जनतेच्या अपेक्षा लक्षात घेऊन हा निर्णय घेतला आहे, असे ते म्हणाले.

यावेळी त्यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्याबद्दल माझ्या मनात कायम आदर राहील. माझ्याकडून त्यांच्याविरोधात एकही अपशब्द जाणार नाही, असे सांगत त्यांनी भावनिक भूमिका मांडली.

पवनराजे निंबाळकर हत्याकांड प्रकरणाच्या निकालाचा उल्लेख करताना ओमराजे यांनी आपली खंत व्यक्त केली. निकालानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संवाद झाल्याचे त्यांनी सांगितले. उच्च न्यायालयात न्याय मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त केल्याचेही त्यांनी नमूद केले.

महायुतीत सहभागी झाल्यानंतरही धाराशिवमधील राजकीय संघर्ष संपणार नसल्याचे स्पष्ट करत त्यांनी भाजप आमदार राणा (पान ४ वर)

### शिवसेना काँग्रेसमध्ये विलीन करण्याचा विचार..?

ठाकरेंच्या फुटीर ६ खासदारांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्लांना एक पत्र लिहीले आहे, या पत्रात अनेक धक्कादायक दावे केलेत. ठाकरेंचा पक्ष मुख्य विचारधारेपासून भरकटला आहे. तसंच पक्षाला काँग्रेसमध्ये विलीन करण्याचा विचार सुरू होता असा दावा पत्रातून करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. उद्धव ठाकरे यांनी मात्र हा दावा फेटाळला. तीस वर्ष काँग्रेसची लढलो पण त्यांनी पक्ष संपवण्याचा कधी विचार केला नाही. आता ज्यांना लढायचे त्यांनी समोर येऊन लढा, असं आव्हान त्यांनी दिलं.

# एआय वापरुन मुलीसोबतचे माझे खोटे फोटो तयार केले – मंत्री गिरीश महाजन यांचा खुलासा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्याचे जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांच्या व्हायरल फोटो प्रकरणाला आता एक अत्यंत गंभीर वळण मिळाले आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेले आक्षेपार्ह फोटो हे मूळ नसून आधुनिक एआय तंत्रज्ञानाचा वापर करून तयार केलेले बनावट फोटो असल्याचे महाराष्ट्र राज्य सायबर विभागाने आधीच स्पष्ट केले आहे. या संपूर्ण प्रकरणावर आता स्वतः गिरीश महाजन यांनी पत्रकार परिषद घेत खुलासा केला आहे. ती मुलगी माझ्या दिवंगत मित्राची मुलगी असून तिच्या लग्नाची जबाबदारी माझ्यावर आहे, असे सांगत महाजन यांनी विरोधकांच्या राजकारणावर तीव्र संताप व्यक्त केला आहे.(पान ४ वर)

### तिच्या लग्नाची जबाबदारी माझ्यावर



हे फोटो शेअर केले जात आहेत. सेल्फी क्रॉप करून व्हायरल केले जात आहेत. मी सायबर आणि पोलिसात तक्रार केली आहे. मी मुख्यमंत्र्यांशी बोललो आहे. ही बातमी दिली आहे. ही परिस्थिती खूप गंभीर आहे, त्यावर कारवाई केली जाईल, असा मला विश्वास आहे. यात कोण आहे? याची मला कल्पना नाही. मात्र यावर राजकारण सुरू आहे. त्या मुलीचं लग्न जमवायचं आहे, ती जबाबदारी माझ्यावर आहे, हे चुकीचं केलं जात आहे. आपण राजकारण करतो, त्यात दोन हात करू. मात्र, हे जाणीवपूर्वक केलं जात आहे. त्यावर कारवाई केली जाईल.

– गिरीश महाजन

# घायवळ टोळीतील दोघे कोल्हापुर व अहिल्यानगर येथून अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** पुण्याच्या कुख्यात घायवळ टोळीतील मकोका पुण्यातील फरार दोघाजणांना नगरच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने मोठ्या सीताफिने कोल्हापूर व अहिल्यानगर जिल्ह्यातून जेरबंद केले. रोहित उर्फ बबलू बाबासाहेब गोलेकर (रा. खर्डा, ता. जामखेड) व ज्ञानेश्वर उर्फ माऊली दगडू तोंडे (रा.खेचरे ता. मुळशी जि. पुणे) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

रोहित गोलेकर याच्यावर सात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून माऊली तोंडे याच्यावर एकूण सहा गुन्हे दाखल आहेत. दोघेजण सराईत रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत. रोहित गोलेकर ला खर्डा ता. जामखेड तर माऊली तोंडे याला पुणे शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, विजयसिंह कल्याणराव गोलेकर ( रा. सुर्वेवाडी, खर्डा ता. जामखेड जि. अहिल्यानगर ) यांना दि. १२ मे २०२६ रोजी रोहित उर्फ बबलु बाबासाहेब गोलेकर (रा. खर्डा ता. जामखेड) याने मोबाईल क्रमांकावरुन फोन करुन पुण्यात दाखल झालेल्या संघटीत गुन्हेगारीचे गुन्ह्यामध्ये तु मला वाचविले नाही. तुझ्यामुळे माझे वाटोळे झाले व २० लाख रुपये खर्च झाला असे म्हणुन तुला वाचायचे असेल तर २० लाख रुपये खंडणीची मागणी केली.(पान ४ वर)

# तिरंगी मालिकेत भारताचा तिरंगा फडकला!

## टीम इंडियाचा श्रीलंकेवर ६६ धावांनी दमदार विजय

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** तिरंगी मालिकेतील अंतिम सामना भारत अ आणि श्रीलंका अ या दोन्ही संघांमध्ये पार पडला. डंबूलाच्या मैदानावर पार पडलेल्या या सामन्यात भारतीय संघाचं एकतर्फी वर्चस्व पाहायला मिळाले.



पहिल्या डावात फलंदाजी करताना वैभव सूर्यवंशीचं वादळ पाहायला मिळालं. आतापर्यंत वैभव सूर्यवंशीचा फ्लॉप शो पाहायला मिळाला होता. पण महत्वाच्या सामन्यात त्याने अवघ्या ११ चेंडूत वादळी अर्धशतक आणि ९४ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर भारतीय संघाने ५० षटकांअखेर ९ गडी बाद ३७७ धावांचा डोंगर उभारला होता. या धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेचा डाव ३११ धावांवर आटोपला. यासह भारतीय संघाने हा सामना ६६ धावांनी जिंकून (पान ४ वर)

# रेंगाळलेला मान्सून २५ जूनपासून धो धो बरसणार!

### मुंबई आणि ठाणे परिसराला 'यलो अलर्ट'

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** दीर्घ प्रतीक्षेनंतर अखेर मुंबईत पावसाने हजेरी लावली आहे. दक्षिण मुंबई असो की उपनगरे, रविवारी (२१ जून) सकाळपासूनच अनेक भागांत पावसाची संततधार सुरू झाली आहे. काही परिसरात जोरदार पाऊस कोसळत असून, आकाश काळ्या ढगांनी वेढले आहे. या पावसामुळे हवेत अचानक गारवा निर्माण झाला असून मुंबईकरांना उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला आहे. हवामान खात्याने २० जूननंतर राज्यात पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज वर्तवला होता, त्यानुसारच रविवारी (२१ जून) मुंबईत पावसाचे आगमन झाले. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून रेंगाळलेला मान्सून आता २३ जूनपासून पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता आहे. मान्सूनच्या पुढील प्रवासासाठी हवामान अनुकूल होत आहे. प्रादेशिक हवामान केंद्राने सोमवारपासून मुंबई आणि ठाणे परिसरासाठी मेघगर्जनेसह पावसाचा 'यलो अलर्ट' जारी केला आहे. त्यामुळे सध्याच्या दमट वातावरणातून नागरिकांना दिलासा मिळण्याची चिन्हे आहेत. हवामान विभागाचे माजी प्रमुख कृष्णानंद होसाळीकर यांनी सोशल मीडियाद्वारे माहिती दिली की, वेगवेगळ्या हवामान मॉडेल्सच्या अंदाजानुसार सोमवारपासून मुंबई आणि पुण्यात चांगला पाऊस पडण्याची शक्यता आहे.

रविवारी सातारा पुणे आणि मुंबई परिसरामध्ये काही ठिकाणी पावसाच्या सरी बरसल्या. अहिल्यानगर सह उत्तर महाराष्ट्रातील वातावरणात बदल झाला. काही ठिकाणी पावसाच्या हलक्या सरी बरसल्याने तापमानात घट झाली. २५ जूनपर्यंत मान्सूनचा जोर महाराष्ट्रात फारसा वाढणार नसला, (पान ४ वर)

### उत्तर महाराष्ट्रात तब्बल ९० टक्के पावसाची तूट

एकीकडे मुंबईत पाऊस सुरू झाला असताना, उत्तर महाराष्ट्रात मात्र परिस्थिती चिंताजनक आहे. जून महिना संपत आला तरी मान्सून सक्रिय न झाल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत. नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार आणि अहिल्यानगर या पाच जिल्ह्यांमध्ये २० जूनपर्यंत तब्बल ९० टक्के पावसाची तूट नोंदवली गेली आहे.

| | |
|---|---|
| अपेक्षित पाऊस | : ४५५.८ मिमी |
| झालेला पाऊस | : ४६.१ मिमी |
| एकूण तूट | : ४०९.७ मिमी |

(अंदाजे ४१० मिमी)



# चिखली घाट दरोड्याचा उलगडा; यूपी-बिहारच्या सात सराईत आरोपींना अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** कोळगाव शिवारातील चिखली घाट येथे असलेल्या युको सिस्टीम ट्रान्सफॉर्मर रिपेअरिंग वर्कशॉपवर सशस्त्र दरोडा टाकून लाखो रुपयांचे तांबे व मौल्यवान साहित्य लुटणाऱ्या आंतरराज्य टोळीचा बेलवंडी पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी उत्तर प्रदेश व बिहारमधील सात सराईत आरोपींना अटक करण्यात आली आहे.

२७ एप्रिल २०२६ रोजी मध्यरात्री चार दरोडेखोरांनी वर्कशॉपच्या मागील बाजूचे पत्रे उचकटून आत प्रवेश केला होता. त्यांनी वॉचमन सुभाष पवार व इतर मजुरांचे हात टेपने बांधून चाकूचा धाक दाखवत धमकावले. त्यानंतर मुख्य शटर उघडून साथीदारांना आत बोलावून ट्रान्सफॉर्मरमधील महागडे तांबे व अन्य साहित्य वाहनात भरून पोबारा केला होता. घटनेनंतर बेलवंडी पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक विश्लेषण, (पान ४ वर)

# घोषणांचा पाऊस की प्रश्नांची उत्तरे?

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

महाराष्ट्र राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन आजपासून सुरू होत आहे. राज्याच्या लोकशाही व्यवस्थेत हे अधिवेशन केवळ विधेयके मंजूर करण्याचे व्यासपीठ नसून जनतेच्या आशा-अपेक्षा, प्रश्न आणि सरकारच्या उत्तरदायित्वाची कसोटी असते. मात्र अधिवेशनाच्या पूर्वसंध्येलाच सत्ताधारी आणि विरोधकांमधील आरोप-प्रत्यारोपांचा धुरळा उडाला आहे. सरकार विकासकामांची आकडेवारी मांडत आहे, तर विरोधक राज्यातील वास्तव परिस्थितीची गंभीरता अधोरेखित करत आहेत.

यंदाचा खरीप हंगाम पावसाच्या लहरीपणामुळे संकटात सापडला आहे. अनेक भागांत पेरण्या खोळंबल्या आहेत. काही ठिकाणी दुबार पेरणीची भीती आहे. शेतकरी कर्जबाजारीपणाच्या दुष्टचक्रात अडकला आहे. सरकारने कर्जमाफीची घोषणा केली असली तरी तिची अंमलबजावणी, पात्रता निकष आणि प्रत्यक्ष लाभार्थ्यांचा प्रश्न अद्याप कायम आहे. त्यामुळे या अधिवेशनात राजकीय घोषणांपेक्षा शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावरचे ओझे कमी करण्यासाठी ठोस उपाययोजना काय असतील, याची चर्चा होणे आवश्यक आहे.

राज्याच्या आर्थिक स्थितीबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. एकीकडे हजारो कोटींच्या विकास योजनांच्या घोषणा होत असताना दुसरीकडे कंत्राटदारांची बिले प्रलंबित असल्याचे आरोप आहेत. राज्यावरील वाढते कर्ज, महसुली तूट आणि निधीअभावी रखडलेले प्रकल्प याबाबत सरकारने स्पष्ट भूमिका मांडणे गरजेचे आ[…] विकासाचा गजर आणि आर्थिक वास्तव यातील दरी जनतेसमोर स्पष्ट झाली पाहिजे.

महिलांसाठीची लाडकी बहीण योजना हा सध्या चर्चेचा विषय आहे. या योजनेमुळे लाखो महिलांना आधार मिळाला असला तरी पात्रता तपासणीच्या प्रक्रियेत मोठ्या संख्येने लाभार्थी वगळले गेल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे योजना सुरू ठेवण्याबरोबरच तिची पारदर्शकता आणि विश्वासार्हता टिकवणे ही सरकारची जबाबदारी आहे. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. राज्यात वाढत्या अत्याचारांच्या घटनांवर ठोस चर्चा आणि प्रभावी उपाययोजना अपेक्षित आहेत.

कायदा आणि सुव्यवस्था, वाढते अमली पदार्थांचे जाळे, गुन्हेगारी आणि प्रशासनातील भ्रष्टाचार यांसारख्या मुद्द्यांवरही सरकारला कठोर प्रश्नांचा सामना करावा लागणार आहे. केवळ आकडेवारी आणि प्रसिद्धीपत्रकांमधून राज्य चालत नाही. नागरिकांच्या सुरक्षिततेची [भाव]ना निर्माण करणे हे [प्रश]ासनाचे मूलभूत कर्तव्य आहे.

या अधिवेशनाची आणखी एक राजकीय पार्श्वभूमी म्हणजे सुरू असलेली पक्षांतरे आणि राजकीय [अ]स्थिरता. शिवसेना ठाकरे [गटा]तील खासदार फुटीचे पडसाद सभागृहात उमटणार आहेत. मात्र जनतेच्या दृष्टीने कोण कुठल्या पक्षात गेला हा विषय दुय्यम आहे. रोजगार, शेती, पाणी, शिक्षण, आरोग्य आणि महागाई हेच खरे प्रश्न आहेत. राजकीय अंकगणितापेक्षा लोकांच्या जीवनगणितावर चर्चा होणे अधिक आवश्यक आहे.

महायुती सरकारने उद्योग, पायाभूत सुविधा, मेट्रो, विमानतळ, बंदरे आणि गुंतवणुकीच्या क्षेत्रात मोठी कामगिरी केल्याचा दावा केला आहे. त्याचवेळी विरोधकांनी या दाव्यांची पडताळणी करून पर्यायी दृष्टिकोन मांडणे अपेक्षित आहे. लोकशाहीत सशक्त विरोधक ही विकासाचीच गरज असते. सभागृहावर बहिष्कार टाकणे हा विरोधाचा मार्ग असू शकतो; परंतु जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी सभागृहात उपस्थित राहून सरकारला जाब विचारणे अधिक प्रभावी ठरते.

पावसाळी अधिवेशन हे केवळ राजकीय शक्तिप्रदर्शनाचे मैदान बनू नये. राज्यासमोर उभ्या असलेल्या दुष्काळाच्या छायेतल्या शेती, आर्थिक आव्हाने, रोजगारनिर्मिती, महिला सुरक्षा, आरोग्य व्यवस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसारख्या प्रश्नांवर विधायक चर्चा होणे काळाची गरज आहे.

महाराष्ट्राच्या जनतेला घोषणांचा पाऊस नको आहे; त्यांना हवे आहे उत्तरदायित्व, प्रामाणिकपणा आणि परिणामकारक निर्णय. सरकारने आत्मविश्वासाने प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि विरोधकांनी केवळ टीका न करता पर्याय मांडावेत. पावसाळी अधिवेशनाची खरी यशस्विता याच कसोटीवर ठरणार आहे.

## शनिशिंगणापूरचे पोलीस पाटील बानकर यांचा आळंदीत राज्यस्तरीय सन्मान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**सोनई :** अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीक्षेत्र शनिशिंगणापूरचे पोलीस पाटील सयाराम बानकर यांचा आळंदी येथे आयोजित राज्यस्तरीय पोलीस पाटील आढावा बैठकीत विशेष सन्मान करण्यात आला. सामाजिक कार्य, गावातील कायदा व सुव्यवस्था राखणे, ग्रामविकासातील योगदान तसेच पोलीस प्रशासनाशी प्रभावी समन्वय साधून केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना गौरविण्यात आले.

राज्यातील सुमारे आठ हजार पोलीस पाटीलांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात खेड विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते सयाराम बानकर यांना शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाबासाहेब शिंदे पाटील होते.

यावेळी बोलताना आमदार बाबाजी काळे यांनी बानकर यांच्या कार्याचा गौरव केला. गेल्या तीन दशकांपासून त्यांनी गावातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला असून शासनाच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. संत-महंतांच्या सेवेतून तसेच देवस्थानच्या विकासासाठी दिलेल्या योगदानामुळे शनिशिंगणापूरचा नावलौकिक वाढल्याचे त्यांनी सांगितले.

सन्मान स्वीकारल्यानंतर सयाराम बानकर यांनी हा गौरव शनिशिंगणापूर ग्रामस्थ, पोलीस प्रशासन आणि सहकाऱ्यांच्या सहकार्यामुळे मिळाल्याची भावना व्यक्त केली. भविष्यातही समाजसेवा, ग्रामविकास आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमास राज्य महिला अध्यक्ष तृप्ती भांडेकर, चिंतामण मोटे, नीलकंठ थोरात, रमेश डोळे, संजय दहिफळे, राम शिंदे, दिलीप गायकवाड, संजय वाकचौरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या सन्मानाबद्दल शनिशिंगणापूर परिसरातून बानकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## मुळा कारखान्याच्या संचालकपदी सोपान वीरकर बिनविरोध



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई** नेवासा तालुक्यातील कामधेनू असलेल्या मुळा सहकारी साखर कारखान्याच्या नवनिर्वाचित संचालकपदी सोपान विठ्ठल वीरकर (कांगोणी ) यांची एकमताने बिनविरोध निवड झाली. या निवडीबद्दल मुळा बँकेचे संचालिका पुष्पाताई कराळे, सरपंच सोमनाथ कराळे,सेवा सोसायटीचे अध्यक्ष सुनील रौदळ, संचालक रामभाऊ कराळे,मा.अध्यक्ष दुर्योधन सोनवणे,संचालक पोपट रौदळ,सुभाष भालेकर,मच्छिन्द्र कर्डीले,सामाजिक कार्यकर्ते कचरू बोरुडे,अविनाश कराळे,एडके,आदींनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. वीरकर म्हणाले की, माजी मंत्री शंकररावजी गडाख यांच्या विचारसरणीतून कारखान्याच्या व शेतकऱ्यांच्या हिताच्या विकासासाठी साथ देऊ अशी प्रतिक्रिया दिली.

## कोल्हारमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोल्हार :** आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने कोल्हार येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात योग प्रात्यक्षिक व मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय कोल्हार, भगवती माता विद्यामंदिर तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालय, कोल्हार भगवतीपूर यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते म्हणून भगवती माता विद्यामंदिर भगवतीपूरचे स्थानिक स्कूल कमिटी अध्यक्ष संभाजीराजे देवकर पाटील उपस्थित होते. त्यांनी योग व प्राणायामाचे महत्त्व विशद करत उपस्थित ग्रामस्थ, पालक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच विविध योगासने व प्राणायामाची प्रात्यक्षिके करून त्यांचे आरोग्यदायी फायदे समजावून सांगितले. या प्रसंगी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिभाऊ आहेर तसेच भगवती माता विद्यामंदिरचे प्राचार्य प्रभाकर बडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमास दोन्ही शैक्षणिक संकुलांतील विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून योग दिन उत्साहात साजरा केला.

## बारागाव नांदूर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या आवाहनास प्रतिसाद देत व राहुरी-नगर-पाथर्डी मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली, बारागाव नांदूर-सात्रळ मंडलाच्या वतीने रविवार, दि.२१ जुन रोजी राहुरी तालुक्यातील बारागाव नांदूर येथील मारुती मंदिराच्या प्रांगणात आंतरराष्ट्रीय योगा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी मंडलाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकत्र येऊन वृक्षासन, ताडासन, त्रिकोणासन आदी योगासने केली. ''योगा फॉर वन अर्थ वन हेल्थ'' या वर्षीच्या थीमवर आधारित हा कार्यक्रम आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देणारा ठरला. ''नियमित योग केल्याने शरीर व मन निरोगी राहते. पंतप्रधान मोदी यांनी जगाला दिलेली ही भारताची अमूल्य देणगी आहे,'' असे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

## मुक्तांगण प्राथ. शाळेत चिमुकल्यांचा आंतरराष्ट्रीय योगा दिन उत्साहात


प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** येथील मुक्तांगण प्राथमिक शाळा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व, नियमित योगाभ्यासाचे फायदे तसेच निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमासाठी योगशिक्षिका सौ.सुजाता मेहेत्रे, सौ. गीता जग्गीआणि सौ. सुवर्णा मोरे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. त्यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासने व प्राणायामाची प्रात्यक्षिके करून दाखवली तसेच विद्यार्थ्यांकडूनही उत्साहाने योगासने करून घेतली. योगामुळे शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकास कसा साधता येतो, याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मकसरे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक भरतराव पवार हे उपस्थित होते. यावेळी अनिल काळे व शाळेतील शिक्षकवृंद उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी सांगळे यांनी उपस्थित मान्यवर, योगशिक्षिका आणि सर्वांचे आभार मानले.



## सुजाता इंटरनॅशनल स्कूलमध्ये इंटरनॅशनल योगा दिन साजरा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**सोनई :** सोनई येथील सुजाता इंटरनॅशनल स्कूल अँड. ज्युनिअर कॉलेज स्कूलमध्ये नॅशनल योगा दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून फिटनेस अँड वेलनेस कोच पूनम लकडे तसेच ॲड सुनील गडाख उपस्थित होते. तसेच स्कूलचे संस्थापक किरण सोनवणे आणि मुख्याध्यापिका ज्योती या ही उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. स्कूलचे संस्थापक किरण यांनी उपस्थित प्रमुख पाहुण्याची सत्कार केला. त्यानंतर योगा टीचर अँड. सुनील गडाख यांनी विद्यार्थ्यांना अतिशय चांगल्या प्रकारे आपल्या भाषणांमध्ये मार्गदर्शन केले व योगाचे महत्त्व पटवून दिले.

त्यानंतर योगाचे काही प्रकार मुलांसमोर सादर करून त्यांनी निरोगी राहण्यासाठी योग किती महत्त्वाचा आहे याचे महत्त्व पटवून दिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे शिक्षक सचिन चांडे यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन शाळेच्या शिक्षिका स्वाती गडाख यांनी केले तर आभार प्रदर्शन पल्लवी सोनवणे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षक व शिक्षेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## एमएचटी-सीईटी पीसीएममध्ये अंशुल निर्मळला ९९.९ टक्के, जिल्ह्यात अव्वल क्रमांक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर :** महाराष्ट्रातील अभियांत्रिकी प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी एमएचटी-सीईटी २०२६ परीक्षेत श्रीरामपूर येथील अंशुल प्रवीण निर्मळ याने उल्लेखनीय यश संपादन करत पीसीएम गटात ९९.९ पर्सेंटाइल गुण मिळवले असून अहिल्यानगर जिल्ह्यात अव्वल क्रमांक पटकावला आहे. तसेच जेईई ॲडव्हान्स परीक्षेतही घवघवीत यश संपादन करून त्याने प्रतिष्ठित आयआयटी धारवाड येथे प्रवेश निश्चित केला आहे.

अंशुल हा माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील सोलेस इन्फोटेक, नाशिकचे संस्थापक व उद्योजक प्रवीण निर्मळ यांचा सुपुत्र आहे. तसेच औद्योगिक क्षेत्रातील मेकापावर संस्थेचे संस्थापक प्रशांत निर्मळ आणि शिक्षण क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व, पेंटागॉन इन्स्टिट्यूटचे संचालक व केंब्रिज स्कूलचे संस्थापक प्रमोद निर्मळ यांचा तो पुतण्या आहे. एमएचटी-सीईटीमधील या यशासाठी शिक्षकांचे सहकार्य आणि कुटुंबीयांचा भक्कम पाठिंबा लाभल्याचे अंशुलने सांगितले. विशेष म्हणजे अंशुलने यापूर्वी जेईई मेन्स परीक्षेत ९९.५० पर्सेंट मिळवले असून जेईई ॲडव्हान्स परीक्षेत अखिल भारतीय ८९५८ वी रँक प्राप्त केली आहे. या यशामुळे त्याचा आयआयटीमध्ये प्रवेशाचा मार्ग खुला झाला.

## निर्भय युवा ग्रामीण पत्रकार संघाची राहुरी तालुका बैठक उत्साहात संपन्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**राहुरी :** निर्भय युवा ग्रामीण पत्रकार संघाची महत्वपूर्ण बैठक रविवार, दि. २१ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता राहुरी तालुक्यातील धर्माडी टेकडी येथील गेस्ट हाऊस येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. संघटनेच्या बळकटीकरणासाठी, आगामी उपक्रमांचे नियोजन, ग्रामीण पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर चर्चा तसेच कार्यकारिणीतील विविध नियुक्त्या व पदोन्नती जाहीर करण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष बाळकृष्ण भोसले होते. यावेळी जिल्हासचिव राजेंद्र म्हसे, जिल्हा सहसचिव राजेंद्र पवार, जिल्हासंघटक आर. आर. जाधव, ज्येष्ठ सदस्य बाळासाहेब दातीर, तालुका अध्यक्ष अशोक मंडलिक, तालुका उपाध्यक्ष दीपक मकासरे, तालुका सचिव प्रमोद डफळ, सहखजिनदार जावेद शेख, खजिनदार कमलेश विधाटे,आदी पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत संघटनेच्या कार्यकारिणीतील विविध पदांवर नियुक्त्या करण्यात आल्या. तसेच संघटनेत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या काही पदाधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली. नवनियुक्त तसेच पदोन्नती झालेल्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. संघटनेचे कार्य अधिक प्रभावीपणे पुढे नेण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## सार्वजनिक नळाच्या पाण्यावरून महिलेसह व मुलीस मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील बारागाव नांदूर येथे सार्वजनिक पाण्याच्या नळावरून झालेल्या वादातून एका महिला व तिच्या अल्पवयीन मुलीस शिवीगाळ, दमदाटी व दुखापत केल्याप्रकरणी चौघांविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सुवर्णा दिलीप आळकुटे (वय ३२, व्यवसाय मजुरी, रा. बारागाव नांदूर, ता. राहुरी) यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, दिनांक १९ जून २०२६ रोजी दुपारी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास त्या व त्यांची मुलगी श्रेया या दोघी घराच्या पाठीमागील पाण्याचा नळ सुरू करण्यासाठी गेल्या होत्या.

त्यावेळी राहुल पिटेकर, जालींदर धनवडे, स्वप्निल धनवडे व वच्छला पिटेकर (सर्व रा. बारागाव नांदूर, ता. राहुरी) हे तेथे आले. त्यांनी फिर्यादीस पाण्याचा नळ सुरू केल्याच्या कारणावरून जाब विचारत शिवीगाळ व दमदाटी करण्यास सुरुवात केली. फिर्यादीने पाणी भरण्यासाठी नळ सुरू केल्याचे व पाणी भरल्यानंतर तो बंद करणार असल्याचे सांगितले. मात्र याचा राग आल्याने आरोपींनी पुन्हा शिवीगाळ व धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.यावेळी आरोपी राहुल पिटेकर याने नळ बंद न केल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच त्याने विटा फेकून मारल्याने त्यातील एक विट फिर्यादीच्या मुलगी श्रेया हिच्या खांद्यावर लागून तिला दुखापत झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

या घटनेनंतर सुवर्णा आळकुटे यांनी राहुरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या फिर्यादीवरून आरोपी राहुल पिटेकर, जालींदर धनवडे, स्वप्निल धनवडे आणि वच्छला पिटेकर यांच्याविरुद्ध गुन्हा क्रमांक ७१२/२०२६ दाखल करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १२५(अ), ३५१ व ३५२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

## २३ जूनला अहिल्यानगरमध्ये येणार 'राज्यमाता गोमाता संवाद यात्रा' मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र गोसेवा आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'राज्यमाता गोमाता संवाद यात्रा-२०२६' अंतर्गत अहिल्यानगर येथे मंगळवार, दि. २३ जून रोजी सकाळी १० वाजता नगर-मनमाड रोडवरील संयोग मंगल कार्यालयात भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राहणार आहेत. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. विशेष अतिथी म्हणून आणि यांची उपस्थिती लाभणार आहे.

यावेळी आमदार आमदार संग्राम जगताप, अक्षय कर्डिले, प्राजक्त तनपुरे, हेमंत ओगले, ज्योती गाडे, धनंजय जाधव, जिल्हाधिकारी पंकज आशिया आणि जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

गोसेवा, गोसंवर्धन आणि जनजागृती या विषयांवर मार्गदर्शन होणार असून जिल्ह्यातील गोशाळा संचालक, गोपालक, शेतकरी, गोसेवक व गोप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महा एनजीओ फेडरेशनच्या वतीने सूरज सूर्यवंशी यांनी केले आहे. कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय, गोशाळा महासंघ आणि शेखर मुंदडा मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

## मक्तापूर ते म्हसले रखडलेल्या रस्त्याचे काम त्वरित सुरू करा : गणेश झगरे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तालुक्यातील मक्तापुर ते म्हसले रस्त्याचे काम मागील ९ महिन्यापासून बंद झालेले आहे, त्यामुळे सदर रस्त्यावरून येणार्या शाळकरी मुलांची व प्रवाशांचे खूप हाल होत आहे,त्यामुळे सदर रस्त्याचे रखडलेले काम तत्काळ सुरू करण्यात यावे अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा मराठा सुकाणू समितीचे प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे यांनी दिला आहे.

रस्त्याच्या प्रश्नांच्या संदर्भात झगरे यांनी तहसीलदार पोलीस निरीक्षक, सार्वजनिक बांधकाम कार्यालय, नेवासा यांना लेखी निवेदन देऊन कळवले आहे. तरी प्रशासनाने सदर निवेदनाची दि. २३ जुन २०२६ पर्यंत दखल न घेतल्यास व सदर रस्त्याचे काम सुरू करण्यासाठी सबंधित ठेकेदारास सुचना न दिल्यास दि. २३ जून रोजी छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर महामार्गावर मक्तापुर व म्हसले ग्रामस्थासह रास्ता रोको आंदोलन करणार करणार असल्याचा इशारा गणेश झगरे यांनी दिला आहे.

सदर रस्त्याच्या प्रश्नांबाबत निवेदन देतेवेळी गणेश झगरे यांच्या समवेत मक्तापूर व म्हसले ग्रामस्थ बाबासाहेब ज्ञानदेव शिरसाठ, बाळासाहेब दत्तू शिरसाठ, भानुदास शिरसाठ, आबासाहेब शिरसाठ, जालिंदर नवले, बहिरनाथ शिरसाठ, रामेश्वर नवले, दत्तात्रय शिरसाठ, दत्तात्रय बाबासाहेब शिरसाठ, मक्तापूरचे माजी सरपंच पुनमचंद साळवे, सचिन गायकवाड, गोरक्षनाथ नवघरे,लहानू नवघरे आदि ग्रामस्थांनी देण्यात आला आहे.



हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द • ख • ल

## ग्रंथराज ज्ञानेश्वरी पालखी दिंडीचे ८ जुलैला नेवासातून पंढरपूरकडे प्रस्थान

**नेवासा** : वारकरी संप्रदायातील महत्त्वाचा मानला जाणारा ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पालखी सोहळा यंदा ८ जुलै २०२६ रोजी श्रीक्षेत्र नेवासा येथील ज्ञानेश्वरी जन्मस्थान पैस खांब मंदिरातून पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पावन स्मृतींना उजाळा देणारा हा सोहळा २२ जुलै रोजी पंढरपूर येथे चंद्रभागा नदीत पादुका स्नान व समाज आरतीने संपन्न होणार आहे. नेवासा ते पंढरपूर या प्रवासात पालखी विविध गावांमधून मार्गक्रमण करणार असून वडाळा बहिरोबा, धनगरवाडी, अहिल्यानगर, रुईछत्तीसी, नागलवाडी, देवळाली, शेलगाव, कंदर, वेणेगाव, करकंब व टेंभुर्णी येथे मुक्काम राहणार आहेत. २१ जुलै रोजी टेंभुर्णी येथे भव्य गोल रिंगणाचा सोहळा होणार आहे. यंदाही हजारो वारकरी, भाविक व दिंड्यांचा सहभाग अपेक्षित असून संपूर्ण प्रवास नामस्मरण, भजन, कीर्तन व भक्तिरसाने भारावून जाणार आहे. पालखी सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी महंत हभप देविदास महाराज म्हस्के शास्त्री, माजी आ. पांडुरंग अभंग व विश्वस्त मंडळ जय्यत तयारी करत आहे.

## पाथरे बु. विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

**झरेकाठी** : जागतिक स्तरावर साजऱ्या होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त श्री छत्रपती शिवाजी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पाथरे बु. येथे उत्साहपूर्ण वातावरणात योग दिन साजरा करण्यात आला. पालक व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणेत सहभाग घेत निरोगी जीवनाचा संदेश दिला. कार्यक्रमाच्या प्रारंभी ज्येष्ठ शिक्षक जोंधळे यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व, आधुनिक जीवनशैलीत योगाची वाढती गरज तसेच शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकासामध्ये योगाचे असलेले अनन्यसाधारण योगदान याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. नियमित योगाभ्यासामुळे शरीर सुदृढ राहते, मन शांत व प्रसन्न राहते तसेच एकाग्रता आणि आत्मविश्वास वाढतो, असे त्यांनी सांगितले. यानंतर विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांनी विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणेचा सराव करत योग दिन उत्साहात साजरा केला. विद्यार्थ्यांनी योगाचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवत मोठ्या शिस्तबद्ध पद्धतीने सहभाग नोंदविला. या कार्यक्रमास कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अण्णासाहेब कडू , शिवाजी घोलप, सोमनाथ जेजुरकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक बारगुजे , पर्यवेक्षक तांबे, पालक, विद्यार्थी,शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एसटी स्मार्ट कार्ड योजनेचा ग्रामस्थांनी लाभ घ्यावा : कविता पाटील




**झरेकाठी** : एसटी स्मार्ट कार्ड योजनेचा ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन भाजपच्या महिला तालुकाध्यक्ष कविता पाटील यांनी केले. तालुक्यातील समनापुर येथील ग्रामपंचायतमध्ये आयोजित करण्यात आलेल्या एसटी स्मार्ट कार्ड शिबिराप्रसंगी त्या बोलत होत्या. या शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, ६०० महिला व पुरुषांनी या एसटी स्मार्ट कार्ड योजनेचा लाभ घेतला. भारतीय जनता पक्ष व शिवसेना महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार अमोल खताळ यांच्या नेतृत्वात एसटी स्मार्ट कार्ड शिबिर आयोजित केले होते. या वेळी विविध मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाध्यक्ष दिपालीताई वाव्हळ, भाजपा तालुका अध्यक्ष (दिव्यांग ) सुरेश दळवी, लहानु चाबुकस्वार, मा. सरपंच भाऊसाहेब शेरमाळे, म्हतु शेरमाळे, रणजीत जाधव, संपत गेठे, संदीप शेरमाळे, एकनाथ शेरमाळे अबु इनामदार, राजू गायकवाड, सुनील चांडे, मच्छिंद्र शेरमाळे, राजेश शेरमाळे, रमेश भास्कर आदी मान्यवर उपस्थित होते.

## बेलापूर येथे गतीरोधक बसविण्याचे काम पूर्ण



**श्रीरामपूर** : बेलापूर ते नगररस्त्यावरील बायपास येथे बाह्यवळणावर गतीरोधक बसण्याचे कामास सुरूवात झाली असून ठरल्याप्रमाणे गतीरोधक टाकण्याचे काम पूर्ण करण्यात आले.या भागातील नागरिकांनी केलेल्या तक्रारीनंतर उपविभागातील हे पहिलेच अधिकृत गतिरोधक ठरले आहेत.अति रहदारीच्या या रस्त्यावरील याठिकाणी अपघाताचे प्रमाण वाढले होते. त्यानुसार कामास सुरूवात झाली.

# कर्ज घेण्यासाठी 'रिटर्न' भरला अन् 'लाडकी बहीण' अपात्र झाली !

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : लाडकी बहीण योजनेतील मोठ्या तांत्रिक त्रुटीमुळे हजारो गरजू कुटुंबे लाभापासून वंचित राहत असून 'टॅक्स' आणि 'रिटर्न'मधील फरकाकडे यंत्रणेचे दुर्लक्ष झाल्याचे दिसत आहे. राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'मध्ये सध्या एक मोठा तांत्रिक विरोधाभास समोर आला आहे. शून्य भांडवल असताना केवळ व्यवसाय उभा करण्यासाठी मुद्रा कर्ज किंवा कोणतेही व्यावसायिक कर्ज घेणाऱ्या सामान्य कुटुंबांवर या योजनेमुळे अन्याय होत आहे.

कर्जासाठी बँकेला आवश्यक असणारा आयटी रिटर्न (ITR) भरल्यामुळे घरातील महिला थेट 'अपात्र' ठरवल्या जात असल्याने राज्यातील हजारो कुटुंबांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. एखाद्या नवउद्योजकाला किंवा छोट्या व्यावसायिकाला मुद्रा कर्ज किंवा कोणतेही कर्ज घ्यायचे असल्यास बँक सुरक्षेचा उपाय म्हणून मागील ३ वर्षांचे आयटी रिटर्न (खढठ) मागते. ज्यांचे उत्पन्न करपात्र (Taxable) नाही, असे नागरिक केवळ बँकेची अट पूर्ण करण्यासाठी आणि कर्ज मंजूर करून घेण्यासाठी 'झिरो टॅक्स' (Nil Return) चा आयटीआर फाईल करतात. याचा अर्थ ते सरकारला एक रुपयाही कर (Tax) भरत नाहीत. योजनेच्या पडताळणी प्रणालीने (तशीळषळलरींळेप ड्रीींशा) डेटा तपासताना




केवळ 'घरात कोणी आयटीआर भरला आहे का ?' एवढाच निकष लावला. त्या व्यक्तीने प्रत्यक्षात सरकारला कर भरला आहे की केवळ कागदपत्र म्हणून रिटर्न भरला आहे, यातील फरक ओळखण्यात सरकारी यंत्रणा अपयशी ठरली.


परिणामी, खऱ्या गरजू बहिणींना अपात्रतेचा धक्का बसला आहे. जो सरकारला प्रत्यक्षात 'इन्कम टॅक्स' (Tax) भरतो, त्याच्याच कुटुंबातील बहीण अपात्र व्हायला हवी. केवळ बँकेच्या कर्जापोटी 'रिटर्न' (Return) भरणाऱ्या खऱ्या गरजू कुटुंबाला गरिबीची शिक्षा का ? एकीकडे सरकार तरुणांना स्वावलंबी बनवण्यासाठी मुद्रा कर्ज आणि इतर योजनांद्वारे व्यवसायाला प्रोत्साहन देत आहे, तर दुसरीकडे व्यवसायासाठी कायदेशीर कागदपत्रे पूर्ण केली म्हणून हक्काच्या योजनेतून बहिणींना बाहेर काढले जात आहे.

हा प्रशासकीय गोंधळ असून, सरकारने या त्रुटीत तातडीने सुधारणा करून केवळ 'टॅक्स' भरणारे कुटुंबच अपात्र ठरवावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. त्यामुळे सरकारचे धोरण आर्थिक उद्योगाला प्रोत्साहन की आर्थिक कोंडी असा प्रश्न सर्वसामान्यतून विचारला जात आहे

## तुकाराम मुंढेचा इफेक्ट

### हॉस्पीटल चालकांनी फलक लावले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**पुणतांबा** : राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर श्री तुकाराम मुंढे यांनी धडाकेबाज निर्णय घेण्याचा सपाटा लावला आहे त्यांच्या धडक कारवाईमुळे अन्नात भेसळ करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे हॉटेल दवाखाने यांच्याकडे त्यांनी मागील आठवडयात मोर्चा वळविला आहे. हॉस्पीटल चालकांनी त्यांच्या हॉस्पीटलमध्ये चालविण्यात येणाऱ्या मेडिकल स्टोअर्समध्ये रुग्णांना औषधेघेण्याची सक्ती केली तर याद राखा अशी सक्त ताकीद त्यांनी नुकतीच हॉस्पीटल चालक व त्यांच्या डॉक्टरांना दिली आहे त्याचा परिणाम म्हणून अनेक हॉस्पीटल चालकानी आपल्या हॉस्पीटलच्या दर्शनी भागात हॉस्पीटलच्या मेडिकलमधून औषधे घेण्याची सक्ती नाही असे फलक लावल्यामुळे रूग्णामध्ये आश्चर्य व्यक्त केले जात आहे विशेष म्हणजे छोटया किंवा मोठया हॉस्पीटलमध्ये त्यांची औषधाची दुकाने का टाकली जातात व ती औषधे इतर दुकानात का मिळत नाही. याचे कारण रुग्णांना व समाजाला समजत नाही असे नाही, रुग्णांचा नाईलाज असतो बरेच तज्ञ डॉक्टर फी केवळ २०० रूपये मात्र प्रिस्कीबशनचा कागद संपेपर्यंत किमान २ ते ३ हजारापर्यंतची औषधे टाईप न करता रुग्णांना सुध्दा न समजेल अशा भाषेत लिहून देतात व ती त्यांच्यात दवाखान्यातील मेडिकलमध्ये उपलब्ध करून येतात यामागे रुग्णाचे व डॉक्टरांचे हित किती हा संशोधनाचा विषय नाही कारण त्यामागे अर्थकारण आहे आयुक्त मुंढे यांच्या दणक्यामुळे हॉस्पीटल चालक, डॉक्टर तसेच मेडिकल चालकांचे धाबे दणाणले आहे. एवढेच नव्हे तर डॉक्टरांनी स्पष्ट भाषेत व इतर मेडिकलमध्ये उपलब्ध न होणारी औषधे लिहून दिल्यास त्यांची थेट तक्रार अन्न व औषध प्रशासन विभागाकडे करण्याचा मानस अनेक रूग्ण व सेवाभावी संस्था संघटना यांनी व्यक्त केला आहे.

## पुणे-नाशिक रेल्वे प्रकल्पासाठी पुन्हा प्रयत्न करणार : आ. खताळ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**संगमनेर** : संगमनेर मार्गे प्रस्तावित पुणे-नाशिक रेल्वे मार्ग प्रकल्प रद्द करण्याचा रेल्वे मंत्रालयाचा निर्णय धक्कादायक असून हा प्रकल्प पुन्हा मंजूर व्हावा यासाठी राज्य व केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याचा निर्धार आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केला. संगमनेर तालुक्यातील जनतेच्या भावना लक्षात घेऊन सर्वतोपरी संघर्ष करण्याची तयारी असल्याचेही त्यांनी सांगितले. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दूरसंचार केंद्राच्या कारणास्तव हा प्रकल्प रद्द करण्याची घोषणा केली.

याबाबत बोलताना आ. खताळ म्हणाले की, दूरसंचार केंद्राने रेल्वे मंत्रालयाला पत्र देऊन प्रस्तावित मार्गापासून सुमारे दहा किलोमीटर अंतरावरून रेल्वे मार्ग नेण्यास कोणतीही अडचण नसल्याचे स्पष्ट केले होते. असे असताना प्रकल्प रद्द करण्याचा निर्णय संगमनेरकरांवर अन्याय करणारा आहे. या प्रकल्पासाठी तालुक्यात अनेक ठिकाणी भूसंपादन पूर्ण झाले असून शेतकऱ्यांना शेकडो कोटी रुपयांची भरपाई देण्यात आली आहे. प्रकल्पाची प्रक्रिया पुढे गेलेली असताना अचानक मार्ग बदलणे आणि अखेर प्रकल्पच रद्द करणे हा स्थानिक नागरिक, शेतकरी व व्यापारी वर्गासाठी मोठा धक्का असल्याचे त्यांनी नमूद केले. पुणे-नाशिक रेल्वे मार्ग हा उत्तर महाराष्ट्राच्या विकासाला गती देणारा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून त्याबाबत फेरविचार व्हावा यासाठी लवकरच रेल्वेमंत्री, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांची भेट घेऊन संगमनेरची भूमिका मांडणार असल्याचे आ. खताळ यांनी सांगितले.

## वडगावपान येथे एक हजार विद्यार्थ्यांकडून योगाचा संदेश

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**संगमनेर** : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त संगमनेर तालुक्यातील वडगावपान येथील डी. के. मोरे जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सुमारे एक हजार विद्यार्थ्यांनी मानवी साखळी तयार करून निरोगी वृद्धत्वासाठी योग हा संदेश दिला.

विद्यार्थ्यांनी विविध योगासने व प्राणायामाची प्रात्यक्षिके सादर करत योगाचे महत्त्व अधोरेखित केले. वय वाढल्यानंतर शरीराची लवचिकता कमी होणे, सांधेदुखी, स्नायूंची कमजोरी, संतुलन बिघडणे आणि मानसिक तणाव यांसारख्या समस्यांवर नियमित योगाभ्यास प्रभावी ठरतो, हा संदेश विद्यार्थ्यांनी या उपक्रमातून दिला. यंदाच्या योग दिनाची आरोग्य, ज्ञान आणि जागतिक शांततेसाठी योग ही संकल्पना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आली. प्राचार्य पोपट दये यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडाशिक्षक बाळासाहेब कांडेकर व कलाशिक्षक सत्यानंद कसाब यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. त्यांना विकास पवार, भारत सोनवणे, प्रकाश नेहे, रवींद्र काशीद, गोरख कांबळे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## फुले कृषि विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहात साजरा



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : आपल्या सर्वांच्या जीवनात योगाचे महत्व अनन्यसाधारण आहे. आपल्या दैनंदिन जीवनात योग व प्राणायामाचा अंगीकार केल्यास शारिरीक व मानसीक आरोग्य उत्तम राहते. शरीर, मन व आत्म्याचे संतुलन योग्य प्रकारे राहण्यासाठी योग व प्राणायाम गरजेचा असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. सातप्पा खरबडे यांनी केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक, राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी कल्याण अधिकारी कार्यालयाने विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहामध्ये आंतरराष्ट्रीय योगदिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानवरुन मार्गदर्शन करतांना डॉ. सातप्पा खरबडे बोलत होते. याप्रसंगी संचालक, राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विलास आवारी, आंतरविद्याशाखा जलसिंचन विभाग प्रमुख डॉ. विजय पाटील, कुलगुरूंचे तांत्रिक अधिकारी डॉ. पवन कुलवाल, सावित्रिबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमीक विद्यालयाचे प्राचार्य अरुण तुपविहीरे व प्राथमीक विद्यालयाचे मुख्याध्यापक विलास देशमुख उपस्थित होते.

योगशिक्षक डॉ. बी.डी. पाटील व रविंद्र आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली सविनय शिंदे, डॉ. क्रांती पाटील विद्यार्थी सुंदरम घुले, कृष्णा पवार, विद्यार्थिनी कु. शिवानी शिंदे यांनी उत्तम प्रकारे योग व प्राणायाम प्रात्यक्षिके करुन घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विलास आवारी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. जितेंद्र मेटकर यांनी मानले. या उपक्रमात ५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## द्रोणा अकॅडमीत आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : राहाता तालुक्यातील साकुरी येथील अशोकराव दामोधर दंडवते पाटील ग्रामीण शैक्षणिक प्रतिष्ठानच्या द्रोणा स्कूल व कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष जयराज दंडवते ,संचालिका प्राजक्ताताई दंडवते, उपाध्यक्ष अनुप दंडवते प्राचार्या अनिता रोहोम, शिक्षक, शिक्षिका, तसेच शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी ,शिक्षकांनी व कर्मचाऱ्यांनी एकत्र येऊन योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक केले. योगामुळे शरीर निरोगी मन शांत आणि जीवनशैली संतुलित राहते. याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने झाली. योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध योगासने केली. नियमित योगाभ्यासाचे महत्त्व सांगत आरोग्यदायी जीवनाचा संदेश देण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती एकाग्रता आणि सकारात्मक विचारसरणी वाढण्याचा प्रयत्न करण्यात आला द्रोणा अकॅडमीच्या या उपक्रमाचे सर्वांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक व शिक्षिका यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

## खटोड कन्या विद्यालयात १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वडाळा महादेव** : येथील हिंद सेवा मंडळाच्या भिकाबाई रामधन खटोड कन्या विद्यालयात १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन योग प्रात्यक्षिक करून उत्साहात संपन्न झाला. योगशिक्षक जतीन सोलंकी सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयाच्या विद्यार्थिनी तसेच शिक्षिका यांनी वेगवेगळी योग प्रात्यक्षिके सादर केले. यावेळी मंचावरून बोलताना जतिन सोलंकी सर यांनी योग ही एक दिवस करण्याची गोष्ट नसून त्यामध्ये सातत्य असायला हवे तसे असल्यास सर्वांचेच आरोग्य निरामय राहील त्यामुळे केवळ आंतरराष्ट्रीय योग दिनापुरते च व्यायाम मर्यादित न ठेवता यामध्ये विद्यार्थिनीही सातत्य ठेवावे असे त्यांनी सांगितले. यावेळी एनसीसीच्या विद्यार्थीनी कार्तिकी आढाव, जिग्निशा बिंगले, अंजली दुधाळ व राज्ञी बडदे यांनी मंच संचालन केले त्यांना एनसीसी प्रमुख सोनाली पुंड यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी , उपाध्यक्ष रविंद्र गुलाटी,स्वीकृत नगरसेवक डॉ. दिलीप शिरसाठ, ओंकार जोशी, शशिकांत भूतडा, विद्यालयाचे चेअरमन दत्तात्रय साबळे ,विजय सेवक, अनिल बाबेल, अनिल भनगडे, बाळासाहेब गोराणे, पालक सभेच्या गायत्री बैरागी, प्राचार्या डॉ. मंगला भोसले पर्यवेक्षिका मंगला डोळस, अनिता शिंदे आदीसह सर्व शिक्षक सेवक वृंद तसेच विद्यार्थीनीची उपस्थिती होती.

## आदर्श विद्या मंदिरात आंतरराष्ट्रीय योगा दिन उत्साहात साजरा



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : येथील नेवासा न्यायालयाच्या जवळ असलेल्या आदर्श विद्या मंदिर या विद्यालयात आंतरराष्ट्रीय योगा दिन विद्यार्थ्यांना योगाचे धडे देऊन योग व प्राणायामद्वारे उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.यावेळी विद्यार्थ्यांनी योग व प्राणायामचे महत्व समजून घेतले. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी आदर्श विद्यार्थी मंदिर विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र शेंडे यांनी योग आणि प्राणायामचे महत्व व त्याचे निरोगी जीवनासाठी व सुदृढ शरीरासाठी काय फायदे आहेत हे समजावून सांगितले. प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक गोरक्षनाथ कर्जुले सर यांनी जीवनात योगाचे महत्व आपल्या भाषणातून विद्यार्थींनीना समजावून सांगितले. सदर झालेल्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विद्यालयाचे शिक्षक संदीप निमसे, जगन्नाथ बानकर, राजकुमार पाषाण, शिक्षिका रजनी आरेकर यांनी प्रत्यक्ष योगा करून योग व प्राणायाम प्रात्यक्षिकांद्वारे विद्यार्थ्यांपुढे सादर केले. विद्यार्थ्यांनी प्रतिसाद देत योग आणि प्राणायामला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## श्रीरामपुरात प्लास्टिक पिशव्यांविरोधात नगरपरिषदेची धडक मोहीम

### चार व्यावसायिकांवर कारवाई, ४० हजारांचा दंड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाने शहर प्लास्टिकमुक्त करण्याच्या उद्देशाने बंदी असलेल्या प्लास्टिक पिशव्या व सिंगल युज प्लास्टिकविरोधात विशेष तपासणी मोहीम सुरू केली. या मोहिमेत शहरातील चार व्यावसायिकांवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून सुमारे ४० हजार रुपयांचा प्लास्टिक साहित्याचा साठा जप्त करण्यात आला आहे.



तसेच ४० हजार रुपयांचा दंडही वसूल करण्यात आला आहे. नगरपरिषदेने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटले आहे की, केंद्र शासनाच्या प्लास्टिक बंदी आहेत. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाच्या पथकाकडून शहरातील हॉटेल व्यावसायिक, फळ-भाजी विक्रेते, हातगाडीधारक तसेच इतर व्यापाऱ्यांची तपासणी करण्यात येत आहे.

कचरा व्यवस्थापन नियमांनुसार सिंगल युज प्लास्टिकच्या उत्पादन, साठवणूक, विक्री, वितरण व वापरावर तपासणीदरम्यान चहाचे कागदी कप, प्लास्टिक कॅरीबॅग, थर्माकोल साहित्य तसेच विविध प्रकारच्या बंदी घालण्यात आलेल्या प्लास्टिक वस्तूंचा वापर व साठा आढळून आल्यास संबंधित व्यावसायिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

नगरपरिषद प्रशासनाने नागरिक व व्यापाऱ्यांना आवाहन केले आहे की, १२० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्या, सिंगल युज प्लास्टिक, प्लास्टिक डिश, बाऊल, स्ट्रॉ, सजावटीचे प्लास्टिक साहित्य आणि थर्माकोल वस्तूंचा वापर तातडीने बंद करावा.

नियमांचे उल्लंघन कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. करणाऱ्यांविरुद्ध नगराध्यक्ष करण ससाणे व मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी नागरिकांना पर्यावरण संवर्धनासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

## क्षेत्र स्तरीय शेत रस्ते समित्यामध्ये शेतकऱ्यांची निवड करा : दादासाहेब जंगले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : डिसेंबर २०२५ मध्ये राज्य शासनाने आदेश काढूनही जिल्ह्यातील नेवासा,पाथर्डी,राहुरी व नगर तालुक्यात मुख्यमंत्री बळीराजा शिव पाणंद शेत रस्ते यशस्वी अंमलबजावणीसाठी विधानसभा क्षेत्र स्तरीय समित्यामध्ये शेतकऱ्यांच्या निवडी करण्यात आलेल्या नाहीत. त्या तातडीने करण्यात याव्यात अशी मागणी शिव पाणंद शेतरस्ते चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे केली आहे.

केवळ शेतकरी हिताच्या दृष्टीने व राजकारण विरहित,शेत रस्त्यांची मागणी असलेल्या सर्व शेतकरी बांधवाच्या शेतास दर्जेदार व कायमस्वरूपी रस्ता होण्यासाठी राज्यस्तरीय जिल्हास्तरीय आणि विधानसभा क्षेत्र स्तरीय समिती स्थापन गठीत करण्याचे आदेश महसूल चे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी डिसेंबर २०२५ मध्ये दिलेले आहेत. विधानसभा क्षेत्र स्तरीय समितीमध्ये विधानसभा सदस्य - अध्यक्ष, उपविभागीय अधिकारी सदस्य सचिव आणि सदस्य म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, उपअधिक्षक भूमी अभिलेख, तालुका कृषी अधिकारी, विधानसभा क्षेत्रातील वन परिक्षेत्र अधिकारी, सार्वजनिक बांधकाम व जिल्हा परिषद बांधकाम यांचे उपाभियंता आणि ५ शेतकरी आदींचा यात समावेश आहे.

परंतु अद्यापही या शेतकऱ्यांच्या निवडी वरील चार तालुक्यात झालेल्या नाहीत. अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमीनी ८-१० वर्षापासून पडीक पडलेल्या आहेत,अनेकांचे न्यायालयात वाद चालू आहेत. अनेक कुटुंबात हाणामाऱ्या व प्रसंगी खूनही झालेले आहेत. जिल्ह्यातील उर्वरित तालुक्यात समित्या स्थापन झाल्या असून, त्यांचे काम चालू झाले आहे. परंतु नेवासा, पाथर्डी, राहुरी व नगर या तालुक्यात संबंधित आमदार, उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी यांनी तात्काळ दखल घेऊन समित्यांमध्ये ५ शेतकऱ्यांची निवड करावी ही मागणी केली आहे.

राज्यस्तरीय शेतरस्ते समितीत नेवासा मतदान संघाचे आमदार असूनही त्यांचेच तालुक्यात या क्षेत्रस्तरीय रस्ते समितीत ५ शेतकऱ्यांर्ची निवड नसल्याने अनेक शिव पाणंद व वहिवाटीचे शेत रस्ते खुले करण्याचे प्रलंबित आहे. रस्ते खुले करण्याकरता मोफत पोलीस बंदोबस्ताचे आदेश असूनही शेतकऱ्यांना पैसे भरण्यास भाग पाडले जाते. याकडे आ. विठ्ठल लंघे यांनी तातडीने लक्ष घालून सुधारणा करण्याची अपेक्षा रस्तेग्रस्त शेतकरी बांधवातून व्यक्त होत आहे.

## पान १ वरुन

### बिबट्याशी झुंज देत बापाने वाचविले मुलीचे प्राण!

तत्काळ उपचारासाठी संगमनेर येथे हलविले. घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तसेच रुग्णालयात जाऊन जखमी बाप-लेकींची विचारपूस केली. दरम्यान, डोंगरगाव परिसरात बिबट्याचा वारंवार वावर असूनही वन विभागाकडून प्रभावी उपाययोजना होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी तातडीने पिंजरा लावावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहेत.

### ऑपरेशन टायगर यशस्वी!

जगजितसिंह पाटील यांच्याशी आपला राजकीय विरोध कायम राहणार असल्याचे जाहीर केले. महायुतीत आलो म्हणून नीच प्रवृत्तीच्या लोकांविरोधातील संघर्ष थांबणार नाही, असे ते म्हणाले.

दरम्यान, ठाकरे गटातील परभणीचे संजय जाधव, ईशान्य मुंबईचे संजय दिना पाटील, शिर्डीचे भाऊसाहेब वाकचौरे, यवतमाळ-वाशिमचे संजय देशमुख आणि हिंगोलीचे नागेश पाटील आष्टीकर यांच्यासह ओमराजे निंबाळकर यांनीही शिंदेसेनेत जाण्याचा निर्णय घेतल्याने ठाकरे गटाच्या खासदारांमधील मोठी फूट अधोरेखित झाली आहे. ओमराजे यांच्या निर्णयामुळे धाराशिवच्या राजकारणात नवे समीकरण निर्माण होण्याची शक्यता असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आणि जिल्ह्यातील महायुतीतील अंतर्गत संघर्ष याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

### बहिष्कार सोडून चर्चेला या...

घेतला नाही. एनडीआरएफच्या निकषांपेक्षा अधिक मदत देण्यात आली. दोन हेक्टरची मर्यादा वाढविण्यात आली.

गोगलगायीमुळे झालेले नुकसान, सततच्या पावसामुळे झालेले नुकसान आणि नैसर्गिक आपत्तींमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यात आली.

सरकारच्या तिजोरीवर पहिला अधिकार बळीराजाचा आहे. शेतकरी आपला मायबाप आहे. त्यांना कधीही वाऱ्यावर सोडले जाणार नाही, असे स्पष्ट शब्दांत सांगत त्यांनी शेतकऱ्यांना दिलासा दिला. अल निनोच्यापरिणामामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत शेतकऱ्यांना अधिक मदतीची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

आम्ही खुर्चीला नव्हे तर विकासाला प्राधान्य दिले आहे. महायुतीचे डबल इंजिन सरकार महाराष्ट्राला वेगाने पुढे नेत आहे. केंद्र सरकारचा राज्याला पूर्ण पाठिंबा आहे. विरोधकांनी पायऱ्यांवर बसून स्टंटबाजी करण्याऐवजी सभागृहात यावे, चर्चा करावी आणि जनतेच्या प्रश्नांवर विधायक भूमिका घ्यावी. विरोधकांची संख्या कमी असली तरी आम्ही लोकशाही मानणारे आहोत आणि त्यांना पूर्ण मान देतो, असे सांगत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांना विधायक सहकार्याचे आवाहन केले.

### एआय वापरुन मुलीसोबतचे माझे खोटे फोटो तयार केले ....

पत्रकारांशी बोलताना गिरीश महाजन यांनी आपल्या कुटुंबाचे मूळ फोटो दाखवत संपूर्ण प्रकार समोर आणला. गिरीश महाजन म्हणाले की, माझ्याशी संबंधित फोटो शेअर केले जात आहेत. या संदर्भात मी खुलासा आज करतोय. ती मुलगी माझ्या मित्राची मुलगी आहे. तिचे वडील आज हयात नाहीत. आमचे कौटुंबिक संबंध आहेत. मी काही फोटो दाखवतो, त्यांच्या फॅमिलीसोबतचे, गणपती किंवा इतर ठिकाणचे. ते मुंबईत येतात माझ्या मुलीसोबत, मात्र तेच फोटो व्हायरल केले जात आहेत. सेल्फी फोटो सोशल मीडियावरून व्हायरल केले जात आहेत. त्यात काही फोटो सेल्फी आहेत, काही फोटो क्रॉप केले आहेत, तिथे माझी पत्नी, मुली आहेत. ए आय वापर करून हे फोटो व्हायरल केले जात आहेत, अशामुळे काहींना आयुष्यातून उठावं लागेल, अशी परिस्थिती निर्माण होत आहे. राजकारण आहे, त्यात आपण लढू. मात्र, हे जाणीवपूर्वक असे फोटो व्हायरल केले जात आहेत. मी सायबर सेलमध्ये तक्रार दिली आहे. त्याचं सर्टिफिकेट मला मिळालं आहे, असे त्यांनी म्हटले.

आपली आणि एका कुटुंबाची सामाजिक बदनामी करणाऱ्यांना अजिबात सोडणार नाही, असा इशारा देत महाजन यांनी कायदेशीर लढाईची घोषणा केली. या प्रकरणी मी उच्च न्यायालयात जाणार आहे. हे फोटो व्हायरल करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल. त्याची लिस्ट माझ्याकडे आहे, असे म्हणत गिरीश महाजन यांनी कौटुंबिक फोटो प्रसारमाध्यमांना दाखवले, ज्यामध्ये त्यांचे संपूर्ण कुटुंब आणि ती संबंधित मुलगी एकत्र दिसत असल्याचे त्यांनी सांगितले.

### घायवळ टोळीतील दोघे कोल्हापुर व अहिल्यानगर येथून अटक

तसेच खंडणी न दिल्यास गोळ्या घालुन मारण्याची धमकी देवुन शिवीगाळ, दमदाटी केली. याबाबत खर्डा पोलीस ठाण्यात रोहित उर्फ बबलू गोलेकर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, संतोष मुटकुळे यांचे नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पो.उप.नि.अनंत सालगुडे, पोलीस अंमलदार राहुल द्वारके, फुरकान शेख, शामसुंदर जाधव, राहुल डोके, अमोल आजबे, मनोज साखरे, प्रशांत राठोड, सतिष भवर, चालक महादेव भांड यांचे पथके तयार करुन आरोपीस अटक करण्याच्या सुचना देण्यात आल्या.

पोलीस पथकाने कोल्हापुर जिल्ह्यामध्ये जावुन शहापुर पोलीस ठाणे हद्दीतील यड्राव फाटा परिसरामध्ये आरोपीचा शोध घेतला. त्यावेळी तो मिळुन आला. त्यावेळी रोहित उर्फ बबलु बाबासाहेब गोलेकर याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. तसेच पुणे जिल्ह्यातील वारजे माळवाडी व कोथरूड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यातील फरार आरोपी ज्ञानेश्वर उर्फ माऊली दगडु तोंडे ( रा. खेचरे, ता. मुळशी, जि. पुणे) हा मिरजगांव गांवचे शिवारातील सोलापुर ते अहिल्यानगर जाणारे महामार्गावरील उड्डाणपुलाखाली थांबलेला असल्याची माहिती गुप्त बातमीदारा मार्फत मिळाल्याने सदर ठिकाणावरुन माऊली तोंडे याला ताब्यात घेतले. माऊली तोंडे याने पोलीस पथकाला पुण्यात पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यांची कबुली दिली.

पोलीस पथकाने पकडलेले रोहित उर्फ बबलु बाबासाहेब गोलेकर व ज्ञानेश्वर उर्फ माऊली दगडु तोंडे हे दोघेही आरोपी पुणे येथील कुख्यात घायवळ टोळीशी संबंधीत आहेत. स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने रोहित उर्फ बबलु बाबासाहेब गोलेकर याला पुढील तपास कामी खर्डा पोलीस स्टेशन यांचे व ज्ञानेश्वर उर्फ माऊली दगडु तोंडे याला पुणे शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.अहिल्या नगरच्या स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या या धडाकेबाज कामगिरीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

..............

### तिरंगी मालिकेत भारताचा तिरंगा फडकला!

तिरंगी मालिका आपल्या नावावर केली आहे. या सामन्यात श्रीलंका अ संघाने नाणेफेक जिंकून भारतीय अ संघाला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं होतं. पण हा निर्णय भारतीय संघाने पूर्णपणे चुकीचा ठरवला. वैभव सूर्यवंशीने अवघ्या ११ चेंडूंमध्ये विक्रमी अर्धशतक झळकावलं. या डावात त्याने २९ चेंडूंचा सामना करत १० चौकार आणि ८ षटकारांच्या साहाय्याने ९४ धावांची खेळी केली. त्याचं वेगवान शतक अवघ्या ६ धावांनी हुकलं. त्याला साथ देत प्रियांश आर्यने ३९ धावांची खेळी केली. तिलक वर्माने ६७ आणि ऋतुराज गायकवाडने ४० धावांची खेळी केली. कुमार कुशाग्रने ३६ धावांची खेळी केली. शेवटी अनुकूल रॉयने ३९ धावांची खेळी करून संघाची धावसंख्या ३७७ धावांवर पोहोचवली. श्रीलंका अ संघाला हा सामना जिंकण्यासाठी ३७८ धावांचा डोंगर सर करायचा होता. या धावांचा पाठलाग करताना निरोशन डिकवेला अवघ्या २५ धावांवर माघारी परतला. तर अविष्का फर्नांडो अवघ्या ३ धावा करुन माघारी परतला. नुवाइंदू फर्नांडोने २१ धावा केल्या. सदीरा समरविक्रमाने ५२ धावा केल्या. कर्णधार सहन अर्चिगेने ३८ धावा केल्या. रविंदू फर्नांडोने १९ धावा केल्या. शेवटी वाहूजा सहनने ६२ धावांची खेळी करून एकाकी झुंज दिली. पण श्रीलंकेचा डाव ३११ धावांवर आटोपला.

# आ. काळेंची कार्यतत्परता कोळपेवाडीत पॉवर ट्रान्सफार्मर वेळेत दाखल वीजपुरवठा पुन्हा सुरळीत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी :** ऐन उन्हाळ्यात कोळपेवाडी येथील विद्युत उपकेंद्रातील पाच एमव्हीए क्षमतेचा ट्रान्सफार्मर नादुरूस्त झाला. शेतातील पिके, जनावरांचे व नित्य वापराचे पाणी आणायचे कोठून असा प्रश्न निर्माण झाला. घरातील विद्युत उपकरणे चालेनाशी झाली. उर्वरीत ट्रान्सफार्मरडरे कोळपेवाडी, कोळगाव थडी, शहाजापूर, सुरेगाव या चार गावांना कसाबसा विजपूरवठा करावा लागत होता. त्यातच प्रचंड वाढलेली उष्णता आणि लांबलेला पाऊस यामुळे विजेची मागणी वाढली होती. अशा कठीण प्रसंगात आमदार आशुतोष काळे यांनी तातडीने हालचाली केल्या. वरिष्ठ अधिका-यांना सुचना दिल्या. नवा ट्रान्सफार्मर



वेळेत दाखल झाला. वीज पुरवठा सुरळीत झाला अन सर्वांचा जिव भांड्यात पडला.

अचानक निर्माण झालेल्या या अडचणीमुळे कृषी पंपांना मर्यादित विजपुरवठा होत असल्याने शेतकरी हैराण झाले होते. कडाक्याच्या उन्हाळ्यात शिल्लक पाणी कसे बसे वापरून जगवलेला बारमाही ऊस, फळबागा व चारा पिकांच्या सिंचनासाठी पाणी असूनही पाणी देता येत नव्हते. शेतकऱ्यांच्या अडचणींची दखल घेवून आमदार आशुतोष काळे यांनी महावितरणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना तातडीने नवा ट्रान्सफार्मर देण्याबाबत सुचना दिल्या. त्यानुसार शनिवार (ता.२०) रोजी नवा पॉवर ट्रान्सफार्मर सबस्टेशनमध्ये दाखल झाला. रविवार (दि.२१) पासून या सर्व परिसराला पूर्णदाबाने विजपूरवठा सुरू झाला. कोळपेवाडी, कोळगाव थडी, शहाजापूर, सुरेगाव आदी गावातील वीज ग्राहकांनी व शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करत आ. आशुतोष काळे यांचे आभार मानले.

## भारतरत्न मदर तेरेसा इंग्रजी शाळेत आंतरराष्ट्रीय योगा दिवस साजरा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर :** भारतरत्न मदर तेरेसा इंग्रजी शाळेत आंतरराष्ट्रीय योगा दिवस मोठ्या उत्साह मध्ये साजरा करण्यात आला. योगा प्रशिक्षक आर. जे.सोनवणे सोनवणे यांनी सर्व विद्यार्थी व शिक्षकांना विविध योगासनांची प्रात्यक्षिके सादर करून योगासनाचे आजच्या दैनंदिन जीवनातील महत्व याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

आंतरराष्ट्रीय योग दिनामध्ये सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग नोंदवत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. याबद्दल शाळेचे व्यवस्थापक फादर विल्फ्रेड सल्ढाणा यांनी सर्व विद्यार्थी व शिक्षकांचे आभार व्यक्त केले.यावेळी शिक्षक वृंद उपस्थित होते.



## नियमित योगासनाने व्यक्ती शारीरिक, मानसिक, भावनिक दृष्टीने सक्षम राहतो

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** ''नियमित योगासन केल्याने व्यक्ती व विद्यार्थी यांचे शारीरिक, मानसिक ,भावनिक व बौध्दिक आरोग्य सक्षम राहते ''असे उदगार नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी यांनी आंतरराष्ट्रीय योगदिनी रविवार (ता,२१) रोजी येथील सेंट मोनिका इंग्लिश माध्यमाच्या शाळेत योगदिन कार्यक्रम आरंभ करतांना काढले. देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी १२ वर्षापूर्वी युनोत मांडलेला ''योग-दिनाला'' जागतिक मान्यता मिळावी ठराव युनोने मान्य करून दरवर्षी२१जून,हा दिन आंतरराष्ट्रीय योग दिन संपूर्ण जगात साजरा करावा म्हणून सूचना दिल्या तेंव्हापासून.वैजापूरातील सेंट मोनिका इंग्लिश माध्यमाच्या शाळेत ही दरवर्षी योगादिन गेल्या १२वर्षा पासून सातत्याने होत आहे या निमित्ताने या वर्षी ही या योगादिन



निमित्ताने रविवार (ता,२१) रोजी सकाळी सात वाजता योगदिन निमित्त योगाचार्य डॉ.अशोक सरोदे यांच्या उपस्थितीत सेंट मोनिका शाळेत विद्यार्थी सोबत शहरातिल नागरिक, महिला व पुरुष यांनी डॉ. सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली योगासने एक तासभर केली. या प्रसंगी माजी नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी, सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी तथा जेष्ठ समाजसेवक धोंडीरामसिंह राजपूत, आर. पी,क्षीरसागर,प्रकाश माळी, योग शिक्षक विजय देशमुख, दशरथ बनकर, राजेश गायकवाड, सावन राजपूत,महेश भालेराव,प्रा,जवाहर कोठारी,प्रकाश माळी,जीवन राजपूत , प्राचार्य किशोर साळुंके, सेंट मोनिका इंग्लिश शाळेचे शिक्षक वृंद,व नागरिक, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

## योगगुरु स्वामी रामदेव यांचा आंध्र प्रदेशातून 'योगमय राष्ट्र, योगमय विश्व'चा संदेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**विजयवाडा :** १२व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आंध्र प्रदेशातील विजयवाडा येथे पतंजली योगपीठ (ट्रस्ट) आणि आंध्र प्रदेश सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात योगगुरू स्वामी रामदेव, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्रबाबू नायडू तसेच आचार्य बालकृष्ण यांची प्रमुख उपस्थिती होती.यंदाच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची संकल्पना स्वस्थ आयुष्यासाठी योग अशी असून स्वामी रामदेव यांनी योगाला जागतिक स्तरावर लोकप्रिय बनविण्यात भारताच्या ऋषीपरंपरेचे योगदान अधोरेखित केले. करो योग, रहो निरोग हा संदेश देत त्यांनी योग ही



केवळ व्यायामपद्धती नसून जीवनशैली असल्याचे सांगितले.मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांनी योग प्रत्येक घरापर्यंत पोहोचवून जनआंदोलन बनविण्याचा संकल्प व्यक्त केला. आंध्र प्रदेशला तंत्रज्ञानासोबतच अध्यात्म आणि वेलनेसचे केंद्र बनविण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमात आचार्य बालकृष्ण लिखित 'योगविज्ञाननिधिः' या ग्रंथाचे तसेच आंध्र प्रदेश आयुष विभागाच्या 'आयुष आरोग्य सूत्रावली' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. पतंजली गुरुकुलम व विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी विविध योगप्रकारांचे प्रात्यक्षिक सादर केले. पहाटेपासून हजारो योगसाधकांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमातून 'योगमय राष्ट्र, योगमय विश्व'चा प्रभावी संदेश देण्यात आला.

# दादा वामन जोशी नवीन मराठी शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** दादा वामन जोशी नवीन मराठी शाळेत २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक आरोग्य आणि निरोगी जीवनशैलीची जाणीव निर्माण व्हावी या उद्देशाने विविध योगासने, प्राणायाम व ध्यानाचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थना व योग दिनाच्या महत्त्वाविषयी माहिती देऊन करण्यात आली. योगगुरू पूजा सोलंकी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी विविध योगप्रकारांचे सादरीकरण केले. योगामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहते, एकाग्रता वाढते तसेच आत्मविश्वास दृढ होण्यास मदत होते, याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

हिंदसेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी उपाध्यक्ष रवींद्र गुलाटी, सहसचिव अशोक उपाध्ये, शाळेचे चेअरमन ऋषिकेश जोशी, बालवाडी विभागाचे चेअरमन दीपक कुऱ्हाडे, प्रशासकीय अधिकारी बी. एस. कांबळे, स्कूल कमिटी सदस्य संजय कासलीवाल, गोपाल उपाध्ये, शशिकांत कडुसकर, अमोल कोलते, रत्नमाला गाडेकर, अनिल भनगडे, ओंकार जोशी तसेच प्रभारी मुख्याध्यापक भरत शेंगाळ उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी नियमित योगाभ्यास करण्याचा संकल्प केला. सूत्रसंचालन विजय दवणे यांनी केले.



## संत निरंकारी मिशनतर्फे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई :** निरोगी शरीर, निर्मळ मन, आणि सजग आत्मा हा संकल्प घेऊन संत निरंकारी मिशन व संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशन, सोनई यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विशेष योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात महिला व पुरुषांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. योग प्रशिक्षक ॲड. सुनिल जी गडाख (आर्ट ऑफ लिव्हिंग) यांनी उपस्थितांना विविध योगासने, प्राणायाम व ध्यानाचे महत्त्व समजावून सांगितले. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुधारते तसेच तणावमुक्त जीवन जगण्यास मदत होते, असे त्यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते योग प्रशिक्षकांचा सत्कार श्री. विठ्ठल खाडे जी (मुखी संत निरंकारी मंडळ शाखा सोनई ) यांच्या हस्ते करण्यात आला. या शिबिरात डॉ. बी. के. शिरसाठ, विनायक दरंदले, विजय खंडागळे, राजेंद्र सानप, संजय गर्जे, आणि निरंकारी मंडळाचे भक्तगण उपस्थित होते.

त्यानंतर सामूहिक मंगलाचरण आणि पसायदान घेऊन सांगता करण्यात आली.

## द्रोणा अकॅडमीत नवगतांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** अशोकराव दामोधर दंडवते पाटील ग्रामीण शैक्षणिक प्रतिष्ठानच्या द्रोणा अकॅडमीमध्ये नवगतांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

राहाता तालुक्यातील साकुरी येथील द्रोणा अकॅडमीत नव्या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन आनंदी वातावरणात स्वागत करण्यात आले.शाळेच्या प्रांगणात आयोजित या स्वागत कार्यक्रमात

संस्थेचे अध्यक्ष जयराज दंडवते संचालिका प्राजक्ताताई दंडवते उपाध्यक्ष अनुप दंडवते यांच्या हस्ते विद्यार्थी नवगतांचे गुलाब पुष्प देऊन मनःपूर्वक स्वागत करण्यात आले.

विद्यार्थी प्रदीर्घ विश्रांतीनंतर स्कूलमध्ये आले होते व तो आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. पहिलाच दिवस असल्यामुळे विद्यार्थी आनंदून गेले होते. प्राचार्या अनिता रोहोम यांनी विद्यार्थ्यांना शाळेची माहिती नियम तसेच विविध शैक्षणिक सहशालेय उपक्रमांची माहिती ओळख करून दिली.



## निधन वार्ता

### जमुनाबाई मोरे



**श्रीरामपूर:** सुरेगाव ता. श्रीगोंदा येथील शेतकरी कुटुंबातील जमुनाबाई राजाराम मोरे (८७ वर्षे) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. स्व आबासाहेब मोरे यांच्या त्या मातोश्री तर निसर्ग सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे अध्यक्ष प्रमोद दादा मोरे व मंडळाच्या सचिव वनश्रीताई मोरे /गुणवरे यांच्या त्या आजी होत.

## रेंगाळलेला मान्सून २५ जूनपासून धो धो बरसणार!

तरी कोकणात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडू शकतो. विशेषतः दक्षिण कोकणात पावसाचा जोर अधिक असेल. त्यानंतर २५ जून ते २ जुलै या कालावधीत मान्सूनचा प्रवास अधिक वेगाने होईल आणि उत्तर कोकणातही पावसाचा जोर वाढेल.

जून महिन्याचे तीन आठवडे उलटून गेले तरी पुणे शहरात अजूनही म्हणावा तसा पाऊस झालेला नाही. दुपारी उन्हाचे चटके आणि प्रचंड उकाडा यामुळे पुणेकर हैराण झाले आहेत. शनिवारी कमाल तापमान सरासरीपेक्षा ६.३ अंशाने वाढून ३६.७ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील दोन दिवसांत पुण्याच्या तापमानात घट होईल. रविवारी दुपारनंतर आकाश ढगाळ राहील, तर मंगळवारपासून (२३ ते २५ जून) पुण्यात मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## चिखली घाट दरोड्याचा उलगडा; यूपी-बिहारच्या सात सराईत आरोपींना अटक

सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढण्यात आला. तपासादरम्यान आरोपी शिक्रापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गुन्ह्यात अटकेत असल्याचे निष्पन्न झाले. न्यायालयीन परवानगी घेऊन त्यांचा ताबा घेण्यात आला. आरोपी सध्या संगमनेर व पुणे परिसरात वास्तव्यास होते. या टोळीचा इतर गुन्ह्यांशी संबंध आहे का, याचा तपास सुरू असून बेलवंडी पोलीस पथकाच्या या कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

शनिवार दि . २० जून २०२६

| मिलनम डे | |
|---|---|
| उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत |
| १२९ १५६ ११० २-६ १२३ ३६७ ५५६ | जोड २४-८६-०३-९५-६७ |

| कल्याण | |
|---|---|
| उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत |
| १९० ४६० २८० ०-५ १४० २३० ७८० | जोड ०१-२५-४३-७९-५८ |

| मुंबैम (मेन) | |
|---|---|
| उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत |
| १३० १४९ ११२ ४-२ १३८ २४६ २२८ | जोड ४०-६२-७१-३९-२५ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 13/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 20/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 890 79 450 | 568 96 178 | 147 22 129 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 560 11 290 | 346 37 133 | 890 78 468 | 190 05 258 | 460 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 15/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 4 | |

# रामायण भारतीय संस्कृतीचे तत्त्वज्ञान : स्वामी सरस्वती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर : श्रीराम हे केवळ एका युगाचे नायक नसून संपूर्ण मानवजातीसाठी आदर्श जीवनमूल्यांचे प्रतीक आहेत. रामायण ही केवळ कथा नसून ती भारतीय संस्कृतीचे जीवन,तत्त्वज्ञान आहे. रामकथा कधीही जुनी होत नाही, कारण प्रत्येक पिढीला ती नवे संस्कार, नवी प्रेरणा आणि जीवन जगण्याची दिशा देत असते. चार वेद, उपनिषदे आणि सनातन संस्कृतीचा अमूल्य वारसा आपल्या समाजाला आजही टिकवून ठेवत आहे, असे प्रतिपादन व्यासपीठ चालक स्वामी अद्वैतानंद सरस्वती यांनी केले.**



चिन्मय मिशनच्या वतीने आयोजित तुळशी रामायणावर आधारित सुंदरकांड ज्ञानयज्ञाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. या ज्ञानयज्ञाचा शुभारंभ दीपप्रज्वलनाने भक्तिमय वातावरणात झाला. यावेळी स्वामी प्रत्ययानंद सरस्वती, महापौर ज्योतीताई गाडे, चिन्मय मिशनचे अध्यक्ष ॲड. डी.डी. घोरपडे, उपाध्यक्ष विद्याताई हारदे, कोषाध्यक्ष उत्तमराव साळुंखे, सचिव देवराम मोरे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर आणि मोठ्या संख्येने रामभक्त उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी चिन्मय मिशनचे कोषाध्यक्ष उत्तमराव साळुंखे यांनी प्रास्ताविक करताना सुंदरकांड ज्ञानयज्ञाच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला. चिन्मय मिशनच्या माध्यमातून समाजामध्ये धर्म, संस्कार, अध्यात्म आणि राष्ट्रभक्तीची मूल्ये रुजविण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले जात असल्याची माहिती त्यांनी दिली. मिशनच्या कार्याचा विस्तार, समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचलेला प्रभाव आणि ज्ञानयज्ञामागील पार्श्वभूमी त्यांनी उपस्थितांसमोर उलगडून सांगितली.

स्वामी अद्वैतानंद सरस्वती म्हणाले की, प्रभू श्रीरामांचे व्यक्तिमत्त्व फुलाप्रमाणे सुगंधित आहे. त्यांच्या जीवनातील प्रत्येक प्रसंग मानवाला काही ना काही शिकवण देतो. रामायण ही आपल्या दु:खाचे निवारण करणारी कथा आहे. बुद्धिमान आणि विचारशील व्यक्तींना या ग्रंथात जीवनाचे गूढ आणि तत्त्वज्ञान सापडते. मनातील व्यथा, चिंता आणि अस्थिरता दूर करण्याची ताकद रामकथेमध्ये आहे.

प्रमुख अतिथी महापौर ज्योतीताई गाडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, भगवद्गीता, रामायण आणि भारतीय संस्कृतीतील महान मूल्ये घराघरांत पोहोचविण्याचे मोलाचे कार्य चिन्मय मिशन करत आहे. धर्म, संस्कार आणि अध्यात्म यांचा प्रसार झाल्यास समाज अधिक सुदृढ आणि सुसंस्कृत होईल. रामायणा मधील सुंदरकांड हे श्रीरामांचे परमभक्त हनुमान यांचे लंके मधील प्रवासावर आधारित आहे. असे सौ.गाडे यांनी सांगितले. अशा उपक्रमांमुळे तरुण पिढीला योग्य दिशा मिळत असून या कार्यासाठी महानगरपालिकेसह सर्व समाजघटकांनी सहकार्य करणे आवश्यक आहे. भविष्यातही चिन्मय मिशनच्या उपक्रमांना आपले संपूर्ण सहकार्य राहील,अशी ग्वाही त्यांनी दिली.

ज्ञानयज्ञाच्या शुभारंभामुळे संपूर्ण परिसर रामनामाच्या गजराने आणि भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. उपस्थित भाविकांनी सुंदरकांडाचे महत्त्व, रामकथेचे तत्त्वज्ञान आणि भारतीय संस्कृतीतील त्याचे स्थान याविषयी सखोल माहिती आत्मसात केली. कार्यक्रमामुळे अध्यात्म, संस्कार, समाजप्रबोधन आणि राष्ट्रीय मूल्यांचा संदेश व्यापक स्तरावर पोहोचला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ओंकार पाठक यांनी केले, तर उपस्थितांचे आभार ॲड. डी.डी. घोरपडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी चिन्मय मिशनच्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

# द•ख•ल

## ओंकार देशमुख सी.ए. परीक्षेत उत्तीर्ण



**पाथर्डी :** तालुक्यातील कोरडगाव येथील ओंकार रवींद्र देशमुख एसीए परीक्षामध्ये उत्तीर्ण झाला आहेत. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोरडगाव येथील शाळेमध्ये तर पदव्युत्तर शिक्षण पुणे येथील आबासाहेब गरवारे कॉलेज येथे झाले आहे. तिथून त्यांनी वाणिज्य शाखेची पदवी घेतली आहे, त्यांचे यशाबद्दल आ. मोनिका राजळे यांनी त्यांचे अभिनंदन केले. प्रा.डॉ.सुभाष देशमुख यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

## निलेश डाके यांना आंतरराष्ट्रीय कायदा या विषयात पदव्युत्तर पदवी



**ढोरजळगांव :** शेवगांव तालुक्यातील ढोरजळगांवने येथील शेतकरी कुटुंबातील ॲड. निलेश विठ्ठल डाके यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथून कायद्याची उच्च पदवी (एल.एल.एम.) यशस्वीरीत्या संपादन केली आहे. त्यांनी आंतरराष्ट्रीय कायदा या विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. तसेच नेक्रोफिलिया या विषयावर युनायटेड स्टेट्स, युनायटेड किंगडम, कॅनडा, जर्मनी, दक्षिण आफ्रिका आणि भारत या देशांतील कायद्यांचा तुलनात्मक अभ्यास करून नेक्रोफिलिया कायदा संदर्भात नवीन कायद्याचा प्रस्ताव मांडला आहे. या उल्लेखनीय आणि उत्तुंग यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## दहेश्वर विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिवस



**अमरापुर :** श्री मारुतरावजी घुले पा शिक्षण संस्थेचे दहेश्वर माध्यमिक विद्यालय दहिफळ जूने ता शेवगाव. आज विद्यालयात १२ आंतरराष्ट्रीय योग्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी विद्यालयाचे शिक्षक विशाल जोशी यांनी योग दिनाचे महत्त्व विषद करतांना सांगितले की, २१ जून हा दिवस योगासनांच्या शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक फायद्यांविषयी जागतिक स्तरावर जागरुकता निर्माण करण्यासाठी साजरा केला जातो. हा दिवस तणावमुक्त जीवनशैली, निरोगी आरोग्य व जागतिक शांततेच्या संदेश देतो नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक लवचिकता वाढते स्नायू बळकट होतात. रोगप्रतिकारक शक्ती सुधारते आजच्या धावपळीच्या व ताण तणावाच्या जीवनात योग्य मनाला शांतता, एकाग्रता व मानसिक स्पष्टता प्रदान करतो. विद्यार्थ्यांची अभ्यासात एकाग्रता वाढतो योग्य दिनाचे महत्त्व सांगून शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी बाबासाहेब तुपविहिरे, रणजित जाधव, भाऊसाहेब बर्डे, भगतसिंग मुराडे, राजाराम लिंभोरे, देविदास आरगळे व पालक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार जाधव यांनी केली.

## दिव्यांग विद्यार्थ्यांसह शिक्षकांचे प्रश्न सोडविले जाणार



**अहिल्यानगर :** दिव्यांग विद्यार्थ्यांचे शिक्षण, केंद्र स्तरावरील विशेष शिक्षकांचे प्रश्न आणि पालकांच्या विविध समस्यांना वाचा फोडण्यासाठी केंद्र स्तर विशेष शिक्षक सेल या नवीन सेलची अधिकृत स्थापना करण्यात आली आहे. केंद्रस्तर विशेष शिक्षक सेल पूर्णपणे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आणि त्यांच्याशी संबंधित घटकांच्या सक्षमीकरणासाठी कटिबद्ध असणार आहे. या सेल चे संपूर्ण कामकाज शिक्षक आ. किशोर दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली चालणार आहे. केंद्र स्तर विशेष शिक्षकांच्या आणि दिव्यांगांच्या प्रश्नांची जाण असणारे नेतृत्व पाठीशी असल्याने या सेनेच्या माध्यमातून अनेक प्रलंबित मागण्या मार्गी लागतील, असा विश्वास संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. विशेष शिक्षक सेल'ची प्रमुख उद्दिष्टे दिव्यांग मुलांना मुख्य प्रवाहातील दर्जेदार शिक्षण मिळवून देणे व त्यांच्यासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे राहणार आहे. केंद्र स्तरावर कार्यरत असणाऱ्या विशेष शिक्षकांच्या समस्या, नोकरीविषयक अडचणी व इतर हक्कांच्या लढ्यासाठी हे सेल प्रमुख व्यासपीठ म्हणून काम करेल. तसेच दिव्यांग पाल्यांच्या पालकांना योग्य मार्गदर्शन करणे, विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे व त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे काम संघटनेच्या माध्यमातून केले जाणार आहे. शिंदे यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## फादर्स डे निमित्त संडे चर्च ग्रुपच्यावतीने वडिलांचा सन्मान



**अहिल्यानगर :** फादर्स डेच्या निमित्ताने अहिल्यानगर येथील संडे चर्च ग्रुपच्या वतीने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थित वडिलांचा गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला तसेच त्यांना फादर्स डेच्या शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमादरम्यान बायबलमधील वडिलांच्या प्रेम, त्याग आणि जबाबदारीचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या वचनांचे वाचन करण्यात आले. जसा बाप आपल्या मुलांवर दया करतो, तशी परमेश्वर त्याचे भय बाळगणाऱ्यांवर दया करतो, तसेच ज्याला ज्ञानी पुत्र झाला आहे, त्याला त्याच्यापासून आनंद होईल या वचनांच्या माध्यमातून कुटुंबातील वडिलांचे अनन्यसाधारण स्थान स्पष्ट करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी वडील हे कुटुंबाचा खंबीर आधारस्तंभ असून त्यांच्या त्याग, कष्ट आणि प्रेमामुळेच कुटुंब सुरक्षित व समृद्ध बनते, अशी भावना व्यक्त केली. तसेच सर्व वडिलांच्या उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि सुख-समृद्धीसाठी विशेष प्रार्थना करण्यात आली. कार्यक्रमादरम्यान बाळासाहेब हिवाळे, विजय भिंगारदिवे, राजू देठे, दावीद गरुड, प्रवीण गायकवाड, रत्नाकर ठोंबरे, अरुण जाधव, दयानंद उजागरे, अरुण पंडित, अण्णा नवगिरे, डेव्हिड सूर्यवंशी उपस्थित वडिलांना गुलाबपुष्प देऊन त्यांचा सन्मान केला व फादर्स डेच्या शुभेच्छा दिल्या.

## विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे योगदान : ॲड. देशपांडे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला, सावेडी येथे इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव व सत्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे चेअरमन ॲड. किशोर देशपांडे होते.

कार्यक्रमाची सुरुवात समर्थांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्रास्ताविकात मुख्याध्यापिका वसुधा जोशी यांनी विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल कौतुक व्यक्त करत प्रशालेच्या उज्ज्वल निकालाची माहिती दिली. यावर्षी प्रशालेचा दहावीचा निकाल शंभर टक्के लागला असून बारावीचा निकाल ९८ टक्के लागला आहे. दहावीच्या परीक्षेसाठी २३२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी तब्बल १२२ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य श्रेणीत यश संपादन करून प्रशालेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटविला.

यावेळी श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष मा. दीपक ओहोळ, सेक्रेटरी व प्राथमिक विभागाचे चेअरमन मा. सुरेश क्षीरसागर, कार्यकारिणी सदस्य संध्या कुलकर्णी, सुनील जोशी, सांगळे गल्ली माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक सुनील कानडे तसेच पर्यवेक्षक एल. एम. कुलकर्णी उपस्थित होते.

यावेळी ॲड. किशोर देशपांडे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना शिक्षकांच्या समर्पित कार्याचा गौरव केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बोठे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिल्पा कुलकर्णी यांनी केले. अध्यक्षांचा परिचय कोळंबे यांनी करून दिला. शिक्षक सत्कार वाचन शास्त्री यांनी तर गुणवंत विद्यार्थ्यांची नावे राशीनकर यांनी सादर केली.

## योगाला दिनचर्येचा भाग बनवणे आवश्यक : आ. राजळे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री




**पाथर्डी :** आपल्या संस्कृती मध्ये योगाला महत्त्वाचे स्थान असून सर्वांनी निरोगी आयुष्यासाठी नियमित योगा करणे व योगाला आपल्या दिनचर्ये चा भाग बनवणे आवश्यक आहे. असे मत आ. मोनिका राजळे यांनी दादापाटील राजळे कला व विज्ञान महाविद्यालयात १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्तने व्यक्त केले.

यावेळी बोलताना त्या म्हणाल्या , पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांनी योगाला आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त करून देऊन देशातील सर्व नागरिकांना आरोग्य संपन्न आयुष्यासाठी नियमित योगाचा संदेश दिला आहे. याप्रसंगी त्यांनी सर्वांना योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजधर टेमकर यांनी आ. मोनिका राजळे व सर्व उपस्थित स्वागत केले. शारीरिक शिक्षण संचालक डॉ. रोहित आदलिंग यांनी आयुष मंत्रालयाकडून योग दिनासाठी देण्यात आलेल्या निर्देशानुसार योगासने, प्राणायाम याविषयी मार्गदर्शन केले. योग प्रात्यक्षिके करुन दाखविली.

या कार्यक्रमास डॉ. अण्णासाहेब शिंदे, सुनिल पानखडे, प्रा.डॉ. शांताराम खणगे, दादापाटील राजळे, डॉ. तांबोळी, डॉ. नेहुल, डॉ. घोलप, डॉ. गायकवाड, प्रा. पानसरे, महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. आसाराम देसाई यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर सेवकांनी परिश्रम घेतले.

## आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगविशारद गणेश कुलथे यांच्या 'आरंभ योगा'च्या वतीने राजस्वा स्पोर्ट क्लब, धर्माधिकारी मळा, अहिल्यानगर येथे विशेष योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. विविध वयोगटांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून योगाभ्यासात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी बोलताना कुलथे म्हणाले, योग म्हणजे मन, शरीर आणि आत्मा यांचा समतोल साधण्याचा प्रभावी मार्ग आहे. आधुनिक धकाधकीच्या जीवनात वाढता ताण, मानसिक अस्थिरता, चुकीची जीवनशैली आणि विविध आजारांवर मात करण्यासाठी योग अत्यंत उपयुक्त ठरतो. निरोगी आणि आनंदी जीवनासाठी प्रत्येकाने योग आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवला पाहिजे. शरीरातील लवचिकता वाढविणारे तसेच मानसिक शांतता देणारे विविध योगाभ्यास करण्यात आले. सहभागी नागरिकांनी उत्साहाने सर्व उपक्रमांमध्ये सहभाग घेतला.

'योग, मन, शरीर, आत्मा' हा संदेश देत कुलथे यांनी नियमित योगाभ्यासाचे महत्त्व अधोरेखित केले. योगामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते, मन स्थिर राहते आणि अनेक जीवनशैलीजन्य आजारांपासून संरक्षण मिळते, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना नियमित योगाभ्यास करण्याचे आवाहन करण्यात आले. दररोज काही मिनिटे योगासाठी द्या; आयुष्यभर निरोगी राहण्याची ऊर्जा मिळवा, असा संदेश देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



## पो. नि. महेश पाटील यांचा ऑटो रिक्षा-टॅक्सी चालक-मालक संघटनेकडून सत्कार

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहर वाहतूक शाखेत नव्याने नियुक्त झालेल्या पो.नि. महेश पाटील यांचा अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेच्या वतीने नुकताच सत्कार करण्यात आला. संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी संघटनेचे उपाध्यक्ष दत्ताभाऊ वामन, कार्याध्यक्ष विलास कराळे पाटील, सरचिटणीस अशोक औशीकर, संघटक नासिर खान, जिल्हा कार्यकारिणी सदस्य सोपान दळवी, सागर लांडे, सुनील खरपे, सुनील ढोले, राजू टिपरे, अंबादास येमुल, जुनेद बागवान, गोरख आंबेकर, गोरख खांदवे, सचिन व्हावळ, चैतन्य वैराळ, संतोष गव्हाणे, समीर गीते, निलेश कटके, गोरख सुरंगे, अन्वर शेख, फारुखभाई, प्रकाश गोसावी, भगवान सुतार, भोला शिंदे, सतीश भोबाळ, दिलीप गिरी, गणेश गांगर्डे, बाबासाहेब साळवे, फारुख शेख, मारूप शेख, आनंद दिवटे, घोरपडे मामा यांच्यासह शहरातील विविध रिक्षा स्टॉपचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पो. नि. महेश पाटील यांनी रिक्षा व टॅक्सी चालकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करून नागरिकांना सुरक्षित आणि दर्जेदार सेवा द्यावी, असे आवाहन केले. तसेच वाहतूक शाखा आणि रिक्षा-टॅक्सी संघटना यांच्या समन्वयातून शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले यांनी वाहतूक शाखेसोबत सकारात्मक सहकार्य करण्याची भूमिका मांडत, रिक्षाचालकांच्या विविध समस्या आणि रिक्षा स्टॉपशी संबंधित प्रश्न प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले.

## प्रभात योग रॅलीने सावेडी परिसर दुमदुमला



**अहिल्यानगर :** बाराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगाचे महत्त्व जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी आनंद योग केंद्राच्या वतीने सावेडी परिसरात प्रभात योग रॅली काढण्यात आली. यामध्ये सुमारे २५० योगसाधक, विद्यार्थी आणि योगप्रेमींनी या रॅलीत उत्साहाने सहभाग नोंदविला. योगविषयक जनजागृती करणाऱ्या घोषणांमुळे संपूर्ण सावेडी परिसर योगमय वातावरणाने दुमदुमून गेला.

करे योग, रहे निरोग, चला उठा योग करा, शिकू आणि शिकवू या, साऱ्या जगात योग नेऊ या अशा प्रेरणादायी घोषणांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. गेल्या आठ वर्षांपासून आनंद योग केंद्राच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग रॅलीचे आयोजन करण्यात येत असून, यंदाही या आंतरराष्ट्रीय योग दिनाची 'धेसर ही संकल्पना रॅलीत विशेष आकर्षण ठरली. या विषयावरील फलक आणि संदेशफलक सहभागींच्या हातात झळकत होते. योगामुळे सर्व वयोगटांतील व्यक्तींना निरोगी आणि सक्रिय जीवन जगता येते, हा संदेश या माध्यमातून देण्यात आला. रॅलीदरम्यान भिस्तबाग चौकात योगसाधकांनी विविध योगासनांचे आकर्षक प्रात्यक्षिक सादर केले. वृक्षासन, ताडासन, त्रिकोणासन, सूर्यनमस्कार आदी योगप्रकारांचे सादरीकरण पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात योगसाधकांचे कौतुक करत त्यांना उत्स्फूर्त दाद दिली. यानंतर शुभमंगल कार्यालयात आयुष मंत्रालयाने निर्धारित केलेल्या योग प्रोटोकॉलनुसार सामूहिक योगसाधनेचे आयोजन करण्यात आले.

# निमगाव वाघात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

## विद्यार्थ्यांनी घेतले योग, प्राणायाम आणि ध्यानधारणेचे धडे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर : नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे केंद्र सरकारच्या मेरा युवा भारत, नवनाथ विद्यालय, श्री नवनाथ युवा मंडळ आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या योग शिबिरात शालेय विद्यार्थी, युवक-युवती, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच ग्रामस्थांनी सहभाग नोंदवत योगाबाबत जनजागृतीचा संदेश दिला. योगातून निरोगी जीवनाचा संदेश देण्यात आला.**



कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थितांनी सामूहिक योगाभ्यास करून निरोगी जीवनाचा संकल्प केला. यावेळी बाळासाहेब शहाणे, डॉ. सुनिल गंधे, बबन बनकर यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणेचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. योगामुळे शारीरिक तसेच मानसिक आरोग्य सुदृढ राहते, एकाग्रता वाढते आणि जीवनशैलीत सकारात्मक बदल घडून येतात, असे सांगत त्यांनी योगाचे महत्त्व विशद केले. योग शिबिरादरम्यान ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, वज्रासन, सूर्यनमस्कार यांसारख्या विविध आसनांचे प्रात्यक्षिक करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत प्रत्येक आसनाची माहिती जाणून घेतली. डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य नाना डोंगरे म्हणाले की, योग आणि प्राणायाम हे निरोगी जीवनाचे आधारस्तंभ आहेत. प्रत्येक व्यक्तीने आपल्या दैनंदिन जीवनात योगाचा समावेश केल्यास शारीरिक व मानसिक आरोग्य उत्तम राहते. भारताने संपूर्ण जगाला दिलेली योगाची देणगी आज जागतिक स्तरावर स्वीकारली जात आहे. योगाच्या माध्यमातून सक्षम, सुदृढ व संस्कारित पिढी घडविणे शक्य असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्याध्यापक उत्तम कांडेकर यांनी विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांचे मोठे महत्त्व आहे. योगामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता, आत्मविश्वास आणि शिस्त वाढण्यास मदत होत असल्याचे सांगितले. या उपक्रमाला संतोष, नवनाथ, राजेंद्र शिंदे, सुमन कुरेल, रमेश गाडगे यांचे मार्गदर्शन लाभले.

द • ख • ल

## सनब्राईट इंग्लिश मेडियम स्कूल माळशिरस येथे योग्यदिन साजरा

**माळशिरस :** पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील माळशिरस येथे आज रविवार दिनांक २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योगा दिनाच्या निमित्ताने सनब्राईट इंग्लिश मेडियम स्कूल मध्ये योगादिन साजरा करण्यात आला. इंग्लिश मेडीयमच्या मुलांना व्यायामाचे महत्त्व पटवून देत योगा कसा करावा याविषयी स्कूलच्या मुख्याध्यापिका शितल चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांकडून ताडासन, वृक्षासन, त्रिकोनासन, भुजंगासन, पद्मसन, यासारखी योगासने तसेच सूर्यनमस्कार व ध्यानधारणेची प्रात्यक्षिके करून घेण्यात आली. रोज किमान अर्धा तास मुलांनी योगा करावा . योगामुळे शारीरिक,मानसिक व बौद्धिक तसेच आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते. शरीर तंदुरुस्त राहते, मन एकाग्र होते तसेच मनातील नकारात्मकता कमी होते. त्यामुळे लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांनीच योगा करावा. असे शितल चव्हाण यांनी सांगितले यावेळी स्कूलच्या शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होत्या.




## जिल्हा परिषद मॉडेल स्कुल शिंगवे येथे जागतिक योग दिवस साजरा

**शिंगवे पारगाव :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र शिंगवे यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योग दिवस निमित्त योगा सत्र आयोजित करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नवनाथ सिनलकर साहेब, शिक्षक विलास भोर,अशोक लोखंडे, प्राथमिक आरोग्य केंद्र शिंगवे येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.सुहास मैड, आरोग्य सहाय्यक समर्थ जगताप, व उपकेंद्र शिंगवे येथील आरोग्य सेवक गौरव पाटील,शाळा व्यवस्थापन समिति अध्यक्ष समीर गोरडे, उपाध्यक्ष रेखा पाबळे,आदी मान्यवर शाळेचे विद्यार्थी उपस्थित होते.



## मंचर–शिरूर–राजगुरूनगर–लोणी बससेवा लवकरच सुरू होणार

**लोणी धामणी :** मंचर–शिरूर–राजगुरूनगर–लोणी या महत्त्वाच्या मार्गावर राज्य परिवहन महामंडळाची बससेवा सुरू करण्यासाठी आंबेगाव तालुका भाजप पूर्व मंडल अध्यक्ष किरण वाळुंज यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश मिळण्याची चिन्हे दिसत आहेत. या संदर्भात वाळुंज यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे पत्रव्यवहार करून बससेवा सुरू करण्याची मागणी केली होती.या मागणीची दखल घेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी परिवहन विभाग, पुणे यांना सदर मार्गावरील बससेवा सुरू करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याचे समजते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेतील त्रुटी पूर्ततेसाठी ७ जुलैपर्यंत मुदतवाढ

**नाझरे सुपे :** समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या निर्देशानुसार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मधील प्रलंबित अर्जांच्या तपासणी प्रक्रियेस अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, पुणे विशाल मंगल अशोक लोंढे यांनी यासंदर्भात प्रसिद्धीपत्रक जारी केले आहे. प्रसिद्धीपत्रकानुसार, स्वाधार योजनेसाठी अर्ज केलेल्या आणि त्रुटी दुरुस्तीसाठी परत पाठविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना अर्जातील उणिवा व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी १६ जून २०२६ ते ७ जुलै २०२६ या कालावधीत संधी देण्यात आली आहे. योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी सुरू असून अनेक अर्जांमध्ये आवश्यक कागदपत्रांची कमतरता किंवा तांत्रिक त्रुटी आढळून आल्या आहेत. सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे यांनी विद्यार्थ्यांना आवाहन करताना सांगितले की, त्रुटी दुरुस्तीसाठी परत पाठविण्यात आलेल्या सर्व अर्जदारांनी शासनाने दिलेल्या मुदतीत आवश्यक कागदपत्रे सादर करून अर्ज पूर्ण करावेत. निर्धारित कालावधीत त्रुटींची पूर्तता न झाल्यास संबंधित अर्जांच्या पुढील प्रक्रियेत अडचणी निर्माण होऊ शकतात. याबाबतचे पत्र जिल्हा माहिती अधिकारी, पुणे यांना पाठविण्यात आले असून ही माहिती अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रसिद्ध करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. स्वाधार योजनेच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहाय्य मिळत असल्याने या मुदतवाढीचा लाभ घेऊन पात्र विद्यार्थ्यांनी आपल्या अर्जातील सर्व त्रुटी दूर कराव्यात, असे आवाहनही सहाय्यक आयुक्त विशाल मंगल अशोक लोंढे यांनी केले आहे.

# 'एल निनो'च्या पार्श्वभूमीवर मृद व जलसंधारणाची कामे गतीने पूर्ण करा: जितेंद्र पापळकर

### आढावा बैठकीत जलसंधारणाच्या कामांना गती देण्याच्या सूचना :

श्री. पापळकर यांनी मृद व जलसंधारण योजनांच्या अंमलबजावणीबाबत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा कार्यालयात आढावा बैठक घेतली. यावेळी जलस्रोतांचे संवर्धन, भूजल पुनर्भरण वाढविणे आणि भविष्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान, गाळमुक्त धरण- गाळयुक्त शिवार योजना तसेच प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत मृद व जलसंधारणाची कामे हाती घेण्याबरोबरच नवीन कामांचे प्रस्ताव सादर करावेत. अतिशोषित, टँकरग्रस्त गावांमध्ये भूजल पातळी वाढवण्यासाठीची कामे कमी कालावधीमध्ये पूर्ण करावीत, अशा सूचना श्री. पापळकर यांनी दिल्या.यावेळी विभागाचे उप अभियंता सागर भोर, सुयश महाडीक , ओमकार शेरकर आणि सर्व संबंधित क्षेत्रीय अधिकारी आदी उपस्थित होते.

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** 'एल निनो'च्या पार्श्वभूमीवर भूजल पातळी वाढविण्याच्यादृष्टीने मृद व जलसंधारण उपचारांची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे; जिल्ह्यातील भूजल पातळी वाढीकरिता महत्त्वपूर्ण असलेली ही कामे दर्जेदार पद्धतीने आणि गतीने पूर्ण करावीत, असे निर्देश मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर यांनी दिले. सचिव श्री. पापळकर यांनी पुणे जिल्ह्यातील वाघापूर, गुरोळी, साकुर्डे आदी गावात सुरु असलेल्या पाझर तलाव दुरुस्ती, नाला खोलीकरण, सिमेंट नाला बांध, आदी कामांची पाहणी केली. यावेळी जलसंधारण विभागाचे मुख्य अभियंता नितीन दुसाने, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कमलाकर रणदिवे, प्रादेशिक जलसंधारण अधिकारी चेतन कलशेट्टी, कार्यकारी अभियंता दिपक लांडगे, जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता गौरव बोरकर आदी उपस्थित होते. यावेळी श्री. पापळकर म्हणाले, जलसंधारण ही काळाची गरज असून, पाण्याच्या दुर्भिक्ष्यावर मात करण्यासाठी मृद व जलसंधारणाची अधिकाधिक कामे हाती घ्यावीत. गाळमुक्त धरण–गाळयुक्त शिवार आणि जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून जलसंवर्धनाची कामे करावीत. लोकसहभागाद्वारे गाळ काढण्याच्या व नाला खोलीकरणाच्या कामांना प्राधान्य देण्यात यावे. यावेळी नागरिकांशी संवाद साधताना श्री. पापळकर यांनी आवाहन केले, उपलब्ध पाण्याचा अपव्यय होणार नाही याची दक्षता घेऊन पाण्याचा काटकसरीने वापर करावा, पावसाळ्यातील पाण्याचा साठा करुन त्याचे सूक्ष्म नियोजन करुन वापर करावा.



## पालखी तळावर योगासने करून साजरा केला आंतर राष्ट्रीय योग दिन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिन सासवड येथील पालखी तळावर सासवडकर नागारिकांनी योग साधना करत मोठ्या उत्साहात साजरा केला. विविध सामाजिक संघटना, शालेय विदयार्थी, व्यायामप्रेमी, जेष्ठ नागरिक यांनी यात सहभाग नोंदवला. सासवडच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, मुख्याधिकारी डॉ कैलास चव्हाण, गटनेते अजित जगताप, पाणी पुरवठा सभापती ज्ञानेश्वर गिरमे, नगरसेविका स्मिता जगताप,योगविद्या संस्कार केंद्राचे डॉ घनश्याम खांडेकर व डॉ ऋता खांडेकर, पुरंदर मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ प्रवीण जगताप, भाजप शहराध्यक्ष आनंदभय्या जगताप, मोहिनी टी ग्रुपचे मोहन चव्हाण, दादा भुजबळ, तानाजी सातव, दे धक्का ग्रुपचे विश्वजीत आनंदे, प्रदीप चिंबळकर पुरंदर कला मंचचे स्नेहल देशपांडे, संजय काटकर, मोहन बागडे अनिल कदम, निलेश शिंदे यांसह मोठ्या संख्येने नागरिक या उपक्रमात सहभागी झाले होते.



भारतातील सर्वात स्वच्छ शहर असा नावलौकिक असलेल्या या शहरा तील सासवडकरांचे आरोग्य देखील उत्तम राहो यासाठी आजच्या योगदिनी सर्वांनीच आपला काही वेळ योगासाठी द्यावा अशी अपेक्षा नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांनी यावेळी केली. करा योग राहा निरोग व भारत माता की जयच्या घोषणा यावेळी देण्यात आल्या. सासवड नगरपालिकेचे सर्व खाते प्रमुख, पालिका शिक्षण मंडळाच्या सर्व शाळातील विद्यार्थी, मुख्याध्यापक शिक्षक, जेष्ठ नागरिक, वाचू आनंदे कट्टाचे प्रतिनिधी, महावितरणचे सुनील कामठे, अँड जयेंद्र निकम, अमित पवार आदींची हजेरीही या प्रसंगी लाभली.

## श्रीमती रत्नभागा कबीरबूवा यांचा 'माई माऊली' पुरस्काराने गौरव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** येथील माऊली भक्त स्व.पार्वतीबाई देवराम काळे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात आळंदी देवस्थानचे विश्वस्त चैतन्य महाराज कबीरबूवा यांच्या मातोश्री श्रीमती रत्नभागा केशवराव लोंढे कबीरबूवा यांना 'माई माऊली' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ज्ञानेश्वर महाराज चरित्र समितीचे अध्यक्ष प्रकाश काळे यांच्या माध्यमातून हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप म्हणून मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ तसेच साडी–चोळी देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी आळंदी देवस्थानचे विश्वस्त चैतन्य महाराज कबीरबूवा, माजी नगराध्यक्ष सुरेश वडगावकर, माजी चेअरमन ज्ञानेश्वर पाटील, सचिव अजित वडगावकर, व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, तुकाराम गवारी, श्रीधर घुंडरे, दीपक काळे, सचिन काळे, बंडूनाना काळे, संकेत वाघमारे, पुष्पाताई कुऱ्हाडे, संगिता पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमानिमित्त विणा मंडप येथे हभप सुभाष महाराज गेठे यांचे सुश्राव्य कीर्तन संपन्न झाले. तसेच काळे परिवाराच्या वतीने आषाढी पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या काही दिंड्यांना शिधा वाटप करण्यात आले.

यावेळी मनोगत व्यक्त करताना आळंदी देवस्थानचे विश्वस्त चैतन्य महाराज कबीरबूवा म्हणाले, की माझ्या मातोश्रींना 'माई माऊली' पुरस्काराने गौरविण्यात आले, हा आमच्या परिवारासाठी अत्यंत भावनिक आणि आनंदाचा क्षण आहे. त्यांच्या आयुष्यातील साधेपणा, भक्तीभाव आणि समाजाभिमुख संस्कार हेच आमच्यासाठी प्रेरणास्थान राहिले आहेत. हा सन्मान त्यांच्या कार्याला आणि सेवाभावाला मिळालेली पावती असून भविष्यातही समाजसेवा व वारकरी परंपरेचे कार्य अधिक जोमाने सुरू ठेवण्याची प्रेरणा यातून मिळाली आहे. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रकाश काळे यांनी केले तर मानपत्रांचे वाचन अजित वडगावकर यांनी केले. सुत्रसंचालन श्रीधर घुंडरे यांनी केले व पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.



## सिद्धेश्वर तलाव परिसरात जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड

### आठ जणांवर गुन्हा, ३.८१ लाखांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** सासवड पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे जुना कोडीत रोड परिसरातील सिद्धेश्वर तलावाजवळील शेतामध्ये सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर धाड टाकून आठ जणांविरुद्ध कारवाई केली असून त्यांच्याकडून ३ लाख ८१ हजार ५७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी सासवड पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम कलम १२ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक संतोष घोळवे यांना गोपनीय माहितीदारामार्फत काही व्यक्ती पैशांवर जुगार खेळत असल्याची माहिती मिळाल्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिंह गौर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने शुक्रवारी (दि. १९) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास सिद्धेश्वर मंदिर रोडलगत ओढ्यापलीकडील शेतामध्ये छापा टाकला. यावेळी भरत बबन मोडक (रा. वडकी), मंगेश रमेश खपर्डे (रा. उरुळी कांचन), पुरुषोत्तम गणपत जाधव (रा. सासवड), चंद्रकांत शंकर भिंताडे (रा. भिवडी), रतन आप्पा बडधे (रा. कोडीत), दत्तात्रय साहेबराव वायकर (रा. हांडेवाडी, हडपसर), निलेश बाळासाहेब जगताप (रा. सासवड) आणि निरंजन संभाजी गायकवाड (रा. वडकी) हे आठ जण गोलाकार बसून 'तीन पत्ती' हा जुगार खेळत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी सर्वांना ताब्यात घेऊन त्यांच्या ताब्यातून १ लाख ४८ हजार ४१० रुपये रोख रक्कम, विविध कंपन्यांचे सहा मोबाईल फोन तसेच जुगारासाठी वापरण्यात येणारे आठ पत्त्यांचे कॅट असा एकूण ३ लाख ८१ हजार ५७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.




या कारवाईत पोलीस शिपाई किरण हनुमंत तुपे, महिला पोलीस उपनिरीक्षक अर्चना पाटील, पोलीस हवालदार जाधवर तसेच किवळे, लोंढे, चिले, खेंगरे आणि किर्वे यांनी सहभाग घेतला. किरण तुपे यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली असून पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक अर्चना पाटील करीत आहेत.

## जिल्हा परिषद येथे आंतरराष्ट्रीय योग दिवस संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** योग ही भारत देशाने जगाला दिलेली अमूल्य देणगी आहे; निरोगी व सशक्त समाज निर्मितीसाठी योगाचे महत्त्व समजून प्रत्येक नागरिकाने दैनंदिन जीवनात योगाचा अंगीकार करावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र हंकारे यांनी केले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस जिल्हा परिषद पुणे येथे आयोजित करण्यात आला. यावेळी उपायुक्त पशुसंवर्धन राजेश वासनिक, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. मिलिंद चिद्दरवार, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक (आयुष) डॉ. शोएब इनामदार, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी कल्पना पंडित तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी डॉ. हंकारे म्हणाले, शारीरिक, मानसिक व भावनिक आरोग्य संवर्धनासाठी योगा करणे गरजेचे आहे. नियमित योगा केल्याने तणाव कमी होण्यासह कार्यक्षमता वाढण्यास मदत होते.तसेच आजारांपासून बचाव होण्यास मदत होते, असेही डॉ. हंकारे म्हणाले. श्रीमती माधवी मागलेकर योग प्रशिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली विविध योगासने, प्राणायाम व ध्यानधारणा केली.

## आंतरराष्ट्रीय योग दिनात सुमारे ५ हजार नागरिक सहभागी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' या संकल्पनेवर आधारित पुणे महानगरपालिका व जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने आणि जिल्हा क्रीडा अधिकारी, विविध योग संस्था तसेच संघटना यांच्या सहकार्याने सर परशुराम महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनामध्ये सुमारे ५ हजार नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. यावेळी खासदार प्रा.मेधा कुलकर्णी, आमदार हेमंत रासणे, पुणे महानगरपालिकेच्या महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे महासचिव संजय शेटे, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, उपायुक्त माधव जगताप, डॉ. संतोष टेंगले, डबल महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे आदी उपस्थित होते. यावेळी प्रा. कुलकर्णी यांनी, नागरिकांनी योगा केल्यामुळे आरोग्य सदृढ राहते, मन प्रसन्न राहते, जीवनात सकारात्मक विचार करण्यास प्रोत्साहन मिळते, त्यामुळे नागरिकांनी दररोज योगा करावे असे आवाहन त्यांनी केले.



श्रीमती महापौर नागपुरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

'फिट इंडिया मूव्हमेंट'ला प्रोत्साहन : देशव्यापी 'फिट इंडिया मूव्हमेंट'च्या संकल्पनेला प्रोत्साहन देण्यासाठी आयुष मंत्रालय, भारत सरकारच्या निर्देशानुसार आंतरराष्ट्रीय योग दिन दरवर्षी २१ जून रोजी जिल्ह्यात साजरा करण्यात आला. योग ही सर्वांगीण आरोग्य व कल्याणासाठी जीवनपद्धती म्हणून प्रोत्साहित करण्याचा या दिनाचा उद्देश आहे. प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक आरोग्य व सामाजिक सहभाग यासाठी योग ही एक प्रभावी चळवळ म्हणून उदयास आली आहे, असा संदेश या कार्यक्रमाच्या माध्यमातून देण्यात आला.

यावेळी विविध प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, शाळेतील विद्यार्थी, खेळाडू, प्रशिक्षक, शिक्षक, क्रीडा शिक्षक, युवक, युवती, महिला, पत्रकार, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि क्रीडाप्रेमी आदींनी सहभाग नोंदवला. मुख्य योग प्रशिक्षक मनाली देव यांच्या मार्गदर्शनाखाली ६० योग प्रशिक्षकांकडून प्रात्यक्षिकांचे सादरीकरण करून योगा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

## मु.सा. काकडे महाविद्यालयात १२वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोमेश्वरनगर.** – जागतिक योग दिनाच्या निमित्ताने मु.सा काकडे महाविद्यालयात योग प्रशिक्षक सुधीर साळवे यांचे योग प्रशिक्षण महाविद्यालयात आयोजित करण्यात आले होते.सुधीर साळवे यांनी मानवी जीवनात योगाचे महत्त्व पटवून दिले व सप्रत्यक्षिक योगाचे प्रकार करून दाखवले. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे यांनी दैनंदिन जीवनामध्ये योगासने व प्राणायाम हे शारीरिक मानसिक स्वास्थ्यासाठी खूप महत्त्वाचे असून सर्व कर्मचारी व विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात दररोज प्राणायाम व योगासने करण्याचे आव्हान करून या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या व उपक्रमाचे कौतुक केले.या वेळी संस्थेचे सचिव सतीश लकडे, उपप्राचार्य डॉ.जगन्नाथ साळवे, डॉ.जया कदम, डॉ.प्रवीण ताटे देशमुख, डॉ.संजू जाधव,डॉ.अच्युत शिंदे डॉ.श्रीकांत घाडगे,डॉ आदिनाथ लोंढे, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावर्षी योग दिनाचा विषय ''निरोगी वृद्धत्वासाठी योग''(धजत्रॠअ ॠजठ कएअङढक्ध अत्रॠएखछत्रः) असा आहे यातून आरोग्य सुसंवाद आणि सजगता वाढीस लावणे असा या योग उपक्रमाचा उद्देश आहे. योग दिनानिमित्त संस्थेचे अध्यक्ष सतीश काकडे–देशमुख व महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष तथा सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे विद्यमान संचालक अभिजीत काकडे–देशमुख यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वरिष्ठ महाविद्यालय शारीरिक शिक्षण संचालक डॉ.बी.एन मरगजे यांनी केले व आभार प्रा. दत्तराज जगताप यांनी मानले.

# लेक लाडकी योजनेचा लाभ हजारो मुलींना; तीन वर्षांत ९४८२ लाभार्थी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे सुपे :** मुलींच्या जन्माला प्रोत्साहन देणे, त्यांचे शिक्षण सुनिश्चित करणे आणि भविष्यासाठी आर्थिक आधार उपलब्ध करून देणे या उद्देशाने राज्य शासनाने 'लेक लाडकी' योजना सुरू केली आहे. मुलींबाबतचा सकारात्मक दृष्टिकोन वाढविण्यासह बालविवाहास आळा घालणे आणि मुलींच्या सक्षमीकरणाला चालना देणे हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील मुलींना टप्प्याटप्प्याने आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणाऱ्या या योजनेचा गेल्या तीन आर्थिक वर्षांत तब्बल ९४८२ मुलींना लाभ मिळाला आहे.

जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महिला व बालविकास, जिल्हा परिषद पुणे आनंद खंडागळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, लाभार्थी कुटुंब महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असणे आवश्यक आहे. तसेच लाभार्थ्याचे बँक खाते महाराष्ट्रात असावे आणि कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा अधिक नसावे. पिवळे अथवा केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबांमध्ये १ एप्रिल २०२३ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेल्या एक अथवा दोन मुलींना या योजनेचा लाभ दिला जातो. एका मुलासोबत मुलगी असल्यासदेखील संबंधित मुलगी योजनेस पात्र ठरते.

योजनेअंतर्गत मुलीच्या जन्मानंतर ५ हजार रुपये, इयत्ता पहिलीत ६ हजार रुपये, सातवीत ७ हजार रुपये, अकरावीत ८ हजार रुपये आणि मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर ७५ हजार रुपये असे एकूण १ लाख १ हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य दिले जाते. मुलींच्या शिक्षणाचा प्रवास अखंड राहावा आणि उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत मिळावी, यासाठी ही रक्कम विविध टप्प्यांवर दिली जाते. त्यामुळे पालकांवरील आर्थिक ताण कमी होण्यास मदत होत असल्याचे आनंद खंडागळे यांनी सांगितले.

उपलब्ध आकडेवारीनुसार, २०२३–२४ या आर्थिक वर्षात १४०० लाभार्थींना ७० लाख रुपयांचे वाटप करण्यात आले. २०२४–२५ मध्ये ५७२० लाभार्थींना २ कोटी ८६ लाख रुपयांचा निधी वितरित करण्यात आला. तर २०२५–२६ या आर्थिक वर्षात आतापर्यंत २३६२ लाभार्थींना १ कोटी १८ लाख १० हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे. यावरून या योजनेबाबत पालकांमध्ये वाढती जागरूकता आणि सकारात्मक प्रतिसाद दिसून येत आहे.मुलींच्या सक्षमीकरणासाठी आणि शिक्षणाला चालना देण्यासाठी 'लेक लाडकी' योजना महत्त्वपूर्ण ठरत असून पात्र कुटुंबांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आनंद खंडागळे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महिला व बालविकास, जिल्हा परिषद पुणे यांनी केले आहे.




## टेक्निकल मध्ये विद्यार्थ्यांनी केली योगाची प्रात्यक्षिके

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बारामती येथील राधेश्याम एन आगरवाल टेक्निकल इन्स्टिट्यूट व जुनिअर कॉलेज या ठिकाणी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी इयत्ता पाचवी ते बारावी तसेच व्यवसाय अभ्यासक्रम असलेल्या विद्यार्थ्यांनी योगाची प्रात्यक्षिके केली.




यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही योगाची प्रात्यक्षिके केली. प्रारंभी योगगुरू दीपाली शेळके यांनी धकाधकीच्या जीवनात आरोग्य आणि व्यायाम व तसेच यासाठी योगाचे महत्त्व प्रतिपादन करीत सर्व विद्यार्थ्यांनी नियमित योगासन करण्याचे आव्हान केले.यांनी विद्यार्थ्यांना योगाची प्रात्यक्षिके करून दाखवली व विद्यार्थ्यांनाही ती करण्यास प्रोत्साहित केले.यावेळी योगगुरू म्हणून नीलम शेळके, ऐश्वर्या शिंदे उपस्थित होत्या.यावेळी प्रभारी प्राचार्य सतीश पाचपुते सर व पर्यवेक्षिका सौ. अलका चौधर यांनी गुलाब पुष्प देऊन त्यांचे स्वागत केले.आंतरराष्ट्रीय योग दिवस २०२६ हा एक महत्त्वाचा टप्पा आहे, या जागतिक उत्सवाचा १२ वा वर्धापनदिन आहे. २०२६ च्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची अधिकृत थीम ''निरोगी वृद्धत्वासाठी योग'' ही आहे. प्रभारी प्राचार्य सतीश पाचपुते सर यांनी आपल्या मनोगतात सर्वांगीण कल्याण आणि पर्यावरणीय सुसंवाद वाढविण्यात योगाची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अरविंद मोहिते यांनी केले तर आभार दत्तात्रय येडवे यांनी केले.

# पोलिसांनी जप्त केलेला गुटखा पुन्हा बाजारात?

## श्रीगोंद्यातील कारवाईनंतर चौकशीचे आदेश



दादा सोनवणे। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यात धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, बेलवंडी पोलिसांनी महिनाभरापूर्वी जप्त केलेला प्रतिबंधित गुटखा व पानमसाला पुन्हा चोरट्या विक्रीसाठी बाजारात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणामुळे पोलीस यंत्रणेत खळबळ उडाली असून वरिष्ठ स्तरावर चौकशी सुरू करण्यात आली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने श्रीगोंद्यातील चोराची वाडी परिसरातील एका कांदा चाळीवर छापा टाकून ३ लाख ७० हजार ४५२ रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व पानमसाला जप्त केला. विशेष म्हणजे, जप्त करण्यात आलेल्या गोण्यांवर पूर्वीच्या कारवाईतील गुन्हा क्रमांक ४६३/२०२६ नमूद असल्याचे आढळून आले. त्यामुळे हा मुद्देमाल पूर्वी पोलिसांनी जप्त केलेल्याच साठ्यातील असल्याचा संशय अधिक बळावला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १५ मे २०२६ रोजी बेलवंडी पोलीस ठाण्याचे तत्कालीन प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या पथकाने श्रीगोंदा शहर, लोणी व्यंकनाथ व आढळगाव परिसरात चार ठिकाणी छापे टाकून ४ लाख ४० हजार २९६ रुपयांचा गुटखा व पानमसाला तसेच २२ लाख रुपये किमतीच्या तीन मोटारी जप्त केल्या होत्या. कारवाईनंतर हा मुद्देमाल श्रीगोंदा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला होता.

त्यानंतर १४ जून २०२६ रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार स्थानिक गुन्हे शाखेने पुन्हा कारवाई करत चोराची वाडी येथून मोठा साठा जप्त केला. या प्रकरणी गुन्हे शाखेचे अंमलदार मनोज साखरे यांच्या फिर्यादीवरून श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून रवी बबन दळवी याला अटक करण्यात आली आहे. इतर दोघांविरुद्धही गुन्हा नोंदविण्यात आला आहे. विशेष म्हणजे, रवी दळवी हा यापूर्वीच्या गुटखा प्रकरणातही आरोपी असल्याचे समोर आले आहे.जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत पोलीस उपअधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यामार्फत चौकशीचे आदेश दिल्याची माहिती समोर आली आहे. जप्त मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात असताना तो पुन्हा बाजारात कसा पोहोचला, याचा तपास आता चौकशी अहवालातून स्पष्ट होणार आहे.

**तब्बल ७० हजार रुपयांचा मुद्देमाल कुठे गेला?**

मे महिन्यातील कारवाईत ४ लाख ४० हजार २९६ रुपये किमतीचा गुटखा जप्त करण्यात आला होता. तर जूनमधील कारवाईत ३ लाख ७० हजार ४५२ रुपये किमतीचा साठा मिळून आला. या दोन्ही आकडेवारीत जवळपास ६९ हजार ८४४ रुपयांचा मुद्देमाल कमी असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे हा माल कुठे गेला, तो विकला गेला का, अथवा इतरत्र हलविण्यात आला का, याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

**जप्त मुद्देमालाला 'पाय' फुटण्याची दुसरी घटना**

अहिल्यानगर जिल्ह्यात पोलिसांनी जप्त केलेला ऐवज गायब होण्याची ही गेल्या काही महिन्यांतील दुसरी मोठी घटना ठरत आहे. यापूर्वी मे २०२५ मध्ये श्रीरामपूर येथील कारवाईत जप्त करण्यात आलेल्या सुमारे १३ कोटी ७५ लाख रुपये किमतीच्या 'अल्प्राझोलम' या अमली पदार्थातील काही हिस्सा चोरीला गेल्याचा प्रकार समोर आला होता. त्या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेतील एका पोलीस कर्मचाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल होऊन अटकेची कारवाईही झाली होती. त्या घटनेची धूळ अद्याप पूर्णपणे बसलेली नसतानाच आता श्रीगोंद्यात जप्त गुटखा पुन्हा बाजारात आल्याच्या संशयामुळे पोलीस विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. चौकशी अहवालातून सत्य समोर येणार असले तरी या प्रकरणाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

द•ख•ल

## शिरसगाव बोडखा सेवा सोसायटीच्या व्हा. चेअरमनपदी रंगनाथ देशमुख



**लिंपणगाव :** तालुक्यातील शिरसगाव बोडखा विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या व्हा. चेअरमनपदी रंगनाथ बाळासाहेब देशमुख यांची बिनविरोध निवड झाली. यावेळी विद्यमान चेअरमन भानुदास सूर्यकांत सोमवंशी तसेच संचालक प्रकाश सोमवंशी, जुबेर सय्यद, राहूल सोमवंशी, शिवाजी लगड, संभाजी गायकवाड, संभाजी धारकर, वाल्मिक दळवी, शांताबाई उबाळे, संजय उबाळे,अलका सोमवंशी, पुष्पलता सोमवंशी, सचिव भाऊसाहेब निंभोरे उपस्थित होते. या निवडीबद्दल रंगनाथ देशमुख यांचे सूर्यकांत सोमवंशी, बाळासाहेब सोमवंशी, डॉ. संतोष देशमुख व सर्व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

## पाथर्डीत जागतिक योग दिन उत्साहात साजरा



**पाथर्डी :** जागतिक योग दिनानिमित्त शहरातील पी.एम.श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाथर्डी (मुली) यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात, शिस्तबद्ध वातावरणात आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने साजरा करण्यात आला. योगाच्या माध्यमातून निरोगी जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि मान्यवरांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते योग शिक्षक लेंडगुळे सर आणि शिरसाट मॅडम यांनी सादर केलेले योग प्रात्यक्षिक. यावेळी मुख्याध्यापिका नंदा तुपे , मुख्याध्यापक राजु गोल्हार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षिका अनुराधा तरवडे, ज्योती जाधव, शिला नांगरे, भावना देवरे, मंगल कीर्तने, मंदा पालवे, सुरेखा बडे, छाया चंदनशिव, अर्चना खाडे, मनीषा फटांगरे, लता भंडारे, जायभाय सर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्वांनी नियमित योगाभ्यास करून निरोगी आणि सकारात्मक जीवन जगण्याचा संकल्प केला.

## परिक्रमा पॉलीटेक्निककडून तीन तालुक्यांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



**श्रीगोंदा :** इयत्ता दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या श्रीगोंदा, दौंड आणि शिरूर तालुक्यातील विविध शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्याचा स्तुत्य उपक्रम परिक्रमा शैक्षणिक संकुलातील परिक्रमा पॉलीटेक्निक महाविद्यालयाने राबविला. विद्यार्थ्यांच्या शाळेत प्रत्यक्ष जाऊन सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन विद्यार्थ्यांसह मुख्याध्यापक आणि शिक्षकांचाही गौरव करण्यात आला. विशेषतः श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालय, श्रीगोंदा येथील पूर्वा रणसिंग हिने ९८.२० टक्के गुण मिळवत सर्वाधिक यश संपादन केले. तसेच खंडेश्वर माध्यमिक विद्यालय, येळपणे येथील प्रसाद कळमकर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज माध्यमिक विद्यालयातील देवयानी माने यांनी ९६ टक्के गुण मिळवून विशेष लक्ष वेधले. माजी मंत्री बबनराव पाचपुते, डॉ. प्रतिभाताई पाचपुते, ॲड. विक्रमसिंह पाचपुते, ॲड. प्रतापसिंह पाचपुते, अकॅडमी डायरेक्टर डॉ. इंद्रायणी पाचपुते, प्रा. अनिल पुंड, डॉ. प्रशांत सूर्यवंशी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## बाबुजी आव्हाड महाविद्यालयात योगदिवस



**पाथर्डी :** बाबुजी आव्हाड महाविद्यालयातील इनडोअर हॉलमध्ये २१ जून रोजी बारावा आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमांमध्ये योगगुरु डॉ. सुनिता डागा यांनी योगासने, ध्यानधारणा, प्राणायाम यांचे मानवी जीवनातील महत्त्व सांगून प्रात्यक्षिके करून दाखवली. सर्व प्रात्यक्षिके अतिशय सहज, सोप्या पद्धतीने उपस्थितांकडून करून घेतली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बबन चौरे यांनी योगाचे महत्त्व सांगताना म्हणाले , सध्याच्या बदलत्या जीवनशैलीमध्ये शारीरिक आरोग्य आणि मानसिक आरोग्य निरोगी व सुदृढ ठेवायची असेल तर योगा अत्यंत महत्त्वाचा आहे. यावेळी उपनगराध्य मंगल कोकाटे, सिंधूताई साठे, सचिन वायकर, कुणाल आव्हाड, शरद मेढे, मुख्याध्यापिका अनुजा कुलकर्णी, प्रा. सलीम शेख उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन शारीरिक शिक्षण संचालक डॉ. विजय देशमुख, एनसीसी विभाग प्रमुख कॅप्टन डॉ.अजयकुमार पालवे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शेखर ससाने व आभार ज्ञानेश्वर गायके यांनी मानले.

## योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करा : भालसिंग



**ढोरजळगांव :** भारतीय जनता पार्टीच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी शासनाच्या विविध योजना तळागाळातील जनतेपर्यंत पोहचवुन त्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न करावेत असे प्रतिपादन दिलीप भालसिंग यांनी बोलताना व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा किसान आघाडीचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कोळगे होते. यावेळी रविंद्र निगुडे, राजेंद्र सांबरे, अशोक आहुजा, कमलेश गांधी,कासमभाई शेख, सुदर्शन कोपनर, राजेंद्र मोटे, राहुल पानसरे, आशोक खिळे, रमेश गाडगे, उपस्थित होते. यावेळी प्राकृतिक शेती कार्यशाळा घेण्यात आली. त्यामध्ये कृषिभुषण राजेंद्र सांबरे यांनी सेंद्रिय शेती कशी करावी याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच आव्हाणे येथील प्रगतिशील शेतकरी सर्फराज सय्यद यांनी कांदा पिकाचे विक्रमी उत्पादन घेतल्याबद्दल प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## योग आनंदी जीवन जगण्याची शैली : पिसाळ



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**एरंडगाव :** जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे, मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अहिल्यानगर येथे राष्ट्रीय सेवा योजना आणि क्रीडा विभागाच्या वतीने 'आंतरराष्ट्रीय योग दिन' अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. के.आर.पिसाळ उपस्थित होते. त्यांनी उपस्थितांना योग दिनाचे महत्त्व पटवून देताना सांगितले की, संयुक्त राष्ट्र संघाने ११ डिसेंबर २०१४ रोजी ठराव मंजूर करून २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिवस' म्हणून घोषित केला. योग म्हणजे शरीर, मन आणि आत्म्याचा एक सुंदर संगम आहे. नियमित योगसाधनेमुळे शरीर निरोगी राहते, मन प्रसन्न होते आणि जीवनात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. या प्रसंगी व्यासपीठावर आणि कार्यक्रमास महाविद्यालयातील प्रा.ए.के.आहेर (शारीरिक शिक्षण संचालक)प्रा.ए.एच. लहाडे (अर्थशास्त्र विभागप्रमुख तथा योगशिक्षिका) प्रा.एस. व्ही.मरकड(कला शाखा व इतिहास विभाग प्रमुख),प्रा. एफ. बी. खान,प्रा. एस. वाय. धरम,प्रा. व्ही. एस. पवार,प्रा. एस. ए. घालमे,प्रा. एन. आर. गीते श्री. अल्तमश शेख या कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सामूहिक योगसाधना केली. क्रीडा व रासेयो विभागाच्या उत्कृष्ट नियोजनामुळे हा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

## चिचोंडी पाटील ग्रामविकास अधिकाऱ्याचा पदभार हस्तांतराचा तिढा?

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**चिचोंडी पाटील :** अहिल्यानगर तालुक्यातील चिचोंडी पाटील ग्रामपंचायतीसमोर अभूतपूर्व प्रशासकीय पेच निर्माण झाला असून, ग्रामविकास अधिकाऱ्यांमधील पदभार हस्तांतरणाचा तिढा ग्रामस्थांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर घाला घालत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. पहिल्या ग्रामविकास अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई झाल्यानंतर नव्या ग्रामविकास अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली; मात्र, अद्याप पदभार हस्तांतरित न झाल्याने ग्रामपंचायतीचे आर्थिक व्यवहार पूर्णपणे ठप्प झाले आहेत. परिणामी, गावाच्या विकासाचा गाडा अक्षरशः रुळावरून घसरला असून नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे.

गावाचा पाणीपुरवठा केळ तलावावर अवलंबून असताना, तलावातील पाणीसाठा धोकादायक पातळीवर पोहोचला आहे. अनेक शेतकऱ्यांकडून शेतीपंपाद्वारे सुरू असलेल्या पाणी उपशामुळे तलावात केवळ मृत पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. त्यामुळे गावावर तीव्र पाणीटंचाईचे संकट ओढवले असून पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने ग्रामस्थांच्या चिंता अधिकच वाढल्या आहेत. दुसरीकडे, तब्बल चार ते पाच महिन्यांपासून कर्मचाऱ्यांचे वेतन रखडल्याने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी असून कामकाजावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. आर्थिक व्यवहार ठप्प झाल्यामुळे गावातील अनेक भाग अंधाराच्या छायेत गेले असून पथदिवे बंद पडले आहेत. स्वच्छतेच्या दृष्टीनेही गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. कचरा संकलन करणाऱ्या वाहनासाठी डिझेल उपलब्ध नसल्याने कचरा उचलण्याचे काम ठप्प झाले असून गावात अस्वच्छतेचे साम्राज्य पसरू लागले आहे.

प्रशासकीय अनास्था आणि पदभार हस्तांतरणातील दिरंगाईचा फटका थेट सर्वसामान्य नागरिकांना बसत असून, चिचोंडी पाटील ग्रामपंचायत आज पाणीटंचाई, अंधार आणि अस्वच्छतेच्या दुष्टचक्रात अडकली आहे. परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत असून, भविष्यात आरोग्यविषयक संकट निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, ग्रामपंचायतीचे आर्थिक व्यवहार तात्काळ सुरू करून रखडलेले प्रश्न मार्गी लावावेत, अन्यथा ग्रामस्थांच्या संयमाचा बांध फुटण्याची शक्यता असून तीव्र लोकक्षोभ उभा राहण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.



## योगामुळे आत्मिक उन्नती : गोसावी

**एरंडगाव :** योग व प्राणायामाची जगाला ओळख करून देणारा हा दिवस आहे. योगामुळे आत्मिक उन्नती होते. योग हा भारतीय संस्कृतीचा अनमोल ठेवा आहे असे प्रतिपादन ग्रेट वेलनेस कोच शंकरराव गोसावी यांनी केले. कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे शेवगांव तालुक्यातील शहरटाकळी हायस्कूल येथे आयोजित कार्यक्रम प्रसंगी बोलत होते. यावेळी योग गुरु महेश भालेराव, हरिश्चंद्र भालके, संदीप गादे, प्राचार्या अंजली चिंतामण, पर्यवेक्षक पोपट खताळ, सहशिक्षिका कमल तुळसे उपस्थित होते. यावेळी गोसावी म्हणाले की, नियमित योग प्राणायाम केल्यामुळे शरीराची कार्यक्षमता वाढते. आपल्या शरीराची झीज भरून काढण्यासाठी सकस संतुलित आहार घेणे अत्यंत आवश्यक आहे. नियमित व्यायाम केल्यामुळे आपल्याला थकवा, आळस येत नाही. यावेळी १२०० हून अधिक विद्यार्थी व शिक्षकांनी योग गुरु महेश भालेराव, शंकरराव गोसावी, हरिश्चंद्र भालके यांच्या मार्गदर्शनाखाली योगा प्राणायामाचे धडे गिरवले. भेसळमुक्त अन्न खा, भरपूर पाणी प्या, पुरेशी झोप घ्या असा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदिनाथ काटे यांनी तर आभार निसार शेख यांनी मानले. कार्यक्रमास सर्व शिक्षक बंधू भगिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## श्रीगोंद्यात योगदिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यात २१ जून रोजी सकाळी सात वाजता आंतरराष्ट्रीय योग दिनाचे सर्वत्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये भव्य असे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आनंदी व उत्साही वातावरणात अनेक विद्यालयांमध्ये शालेय विद्यार्थ्यांना तज्ञ योगाचार्यचे भरीव असे मार्गदर्शन लाभले. आंतरराष्ट्रीय योग दिनामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्मरणशक्ती वाढते, शरीरातील विविध विकारांना कायमची मुक्ती मिळते, यासाठी या योग दिनाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त आहे.

दरम्यान श्रीगोंदा तालुक्यात सर्वच शिक्षण संस्थांच्या विद्यालयांमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात आले. त्यामध्ये तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या लोणी व्यंकनाथ येथील श्री व्यंकनाथ विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी तज्ञ योगाचार्य शिवाजीराव पांडव आणि कुलांगे फिटर यांनी विद्यालयात विद्यार्थ्यांना योगाचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात देखील आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साही वातावरणात पार पडला. याप्रसंगी ज्येष्ठ योगाचार्य बाळासाहेब घायाळ व प्रा. सदाशिव उंडे सर यांनी विद्यार्थ्यांना योग दिनाचे महत्त्व व प्रात्यक्षिके करून दाखवले.

यावेळी घायाळ यांनी बोलताना सांगितले की, या योग दिनामुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठे नवचैतन्य निर्माण होते. शरीर तंदुरुस्त बनते, भूक लागते, ज्या क्षेत्रात काम कराल त्या क्षेत्रात या योगामुळे शरीरामध्ये एक प्रकारचा उत्साह निर्माण होतो. त्यामुळे या योगाला अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे जेष्ठ योगाचार्य बाळासाहेब घायाळ यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. या योग दिनाला विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवाजी पट्टेकर यांचे उपोषण स्थगित

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**भाळवणी :** पारनेर तालुक्यातील भाळवणी येथील सामाजिक कार्यकर्ते शिवाजी सुदाम पट्टेकर यांनी ग्रामसभेत मांडलेल्या गावच्या विकासासंदर्भातील काही महत्त्वाच्या दुर्लक्षित मागण्यांकडे ग्रामपंचायत प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी दि. २० जून रोजी उपोषण सुरू केले होते. या संदर्भात ग्रामविकास अधिकारी श्री. वाघ व उपसरपंच आप्पासाहेब रोहोकले यांनी संबंधीत मागण्या संदर्भात कायदेशीर व सकारात्मक कारवाई सुरु केली असून संपुर्ण कारवाई पुर्ण करण्यासाठी दि. १५ ऑगस्ट २०२६ पर्यंत मुदत मागितली असून तसे लेखी दिल्यामुळे सदरचे उपोषण स्थगित करण्यात आले आहे. या उपोषणादरम्यान गावातील भजनी मंडळाच्या वतीने भजनाचा कार्यक्रमही झाला. यावेळी भानुदास तरटे, मंजाभाऊ चेमटे, भागाची रोहोकले, भाऊसाहेब ठाणगे, धनेश्वर लोंढे, बळीराम सुरसे, सदाशिव पळसकर आदी यावेळी उपस्थित होते.




**भाळवणीत विविध मागण्यांसाठी सुरू केलेले उपोषण ग्रामविकास अधिकारी व उपसरपंच यांच्या लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले. छाया : अभिजीत कपाळे, भाळवणी.**

सदरचे उपोषण रास्त व योग्य मागण्यांसाठी असल्याने या उपोषणाला ग्रामपंचायत सदस्य संदीप संभाजी रोहोकले व सतिश भाऊसाहेब रोहोकले यांनी व्यक्तीशः पाठिंबा जाहीर केला तर गावातील ज्येष्ठ नागरिक शंकर पिराजी रोहोकले, संभाजी आमले यांनीही सक्रिय पाठिंबा दर्शविला.

## प्रत्येक गावाने जिल्हा परिषदेच्या शाळा दत्तक घ्याव्यात : ॲड. ढाकणे

अविनाश मंत्री। राष्ट्र सह्याद्री



**पाथर्डी :** गावाची शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक प्रगती साधायचे असेल तर गट, तट, हेवेदावे, मानपान, विसरून प्रत्येक गावाने जिल्हा परिषदेच्या शाळा दत्तक घ्याव्यात. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आजची गुंतवणूक उद्या गुणवत्तेच्या रूपाने परताव्यासह मिळणार आहे. बौद्धिक संपदा केवळ शहरी भागाची मक्तेदारी राहिली नसून जिल्हा परिषद शाळांमधून शिक्षण घेत विद्यार्थ्यांनी इतिहास घडवला आहे, असे मत ज्येष्ठ नेते ऍड. प्रताप ढाकणे यांनी व्यक्त केले.

तालुक्यातील अकोले गावाचा सुपुत्र जयदत्त नामदेव जायभाय यांची सैन्य दलातील लेफ्टनंट वर्ग एक या पदावर निवड होऊन खडतर प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते त्यांना पदक प्रदान करण्यात आले. याच गावचे भूमिपुत्र माजी केंद्रीय मंत्री स्व. बबनराव ढाकणे यांचे नंतर राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मान होणारे जयदत्त जायभाय एकमेव आहेत. जयदत्त यांचे वडील वकिली व्यवसाय करतात. संपूर्ण कुटुंब वारकरी संप्रदायाची व सेवा कार्यात अग्रेसर आहे. वारकरी संप्रदायाची सर्व सेवा अवगत असलेला जयदत्त जायभाय हा सेनादलातील राज्यातील एकमेव अधिकारी ठरला आहे. या गावचे दुसरे सुपुत्र अभिमन्यू गर्जे यांची ही पोलीस दलात निवड झाली. दोन्ही भूमिपुत्रांचा गौरव समारंभ ग्रामस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आला. यावेळी जेष्ठ वकील दिनकर पालवे, ऍड. संपत गर्जे, नामदेव जायभाय, अविनाश फुंदे, बबन गर्जे, सुखदेव गर्जे, बाळासाहेब गर्जे, तालुका ग्रामोद्योग संघाचे वसंत गर्जे ,मोहटा देवस्थानचे माजी विश्वस्त संदीप पालवे, आदींसह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. विविध व्यक्ती व संस्था पदाधिकाऱ्यांनी दोन्ही भूमिपुत्रांच्या गौरव केला.

यावेळी बोलताना ऍड. ढाकणे म्हणाले, दुष्काळी भागातील तरुणांनी शिक्षणाची कास धरावी, प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शिक्षण पूर्ण करून पुढील पिढ्यांना मार्गदर्शन करावे, असे स्वप्न वै. भगवानबाबा, वै. वामन भाऊ यांनी पाहिले होते. वारकरी संप्रदायाची कौटुंबिक पार्श्वभूमी असलेला राज्यातील पहिला लेफ्टनंट होण्याचा मान सुद्धा जयदत्त जायभाय यांनी मिळवला आहे. सध्या परिस्थितीत याच्या नेमके उलट वातावरण झाले आहे. ग्रामीण भागामध्ये पुढाऱ्यांनी विकासाच्या नावाखाली जनतेची फसवणूक चालवली आहे. व्यसने, गटबाजी, बेरोजगारी, गुन्हेगारीने ग्रामीण जीवन नष्ट होत चालले आहे. खेडी उध्वस्त होत आहे, शहरे बकाल झाले आहेत, त्याचा थेट परिणाम कुटुंब व्यवस्था उध्वस्त होण्यावर झाला असून गावचे गाव पण संपले आहे. पूर्वी सण उत्सव ग्रामीण भागात सामूहिकरीत्या साजरे होत. सायंकाळी मंदिरामध्ये हरिपाठ, पहाटे काकडा होई. प्रसन्न वातावरणामुळे गावालाच मंदिरासारखे रूप असे. आजचे चित्र अत्यंत निराशा जनक व चिंताजनक बनल्याने खेड्यांमधला भारत केव्हाच उध्वस्त झाला असून शहरातील भारत केवळ भोगवाद व अर्थउत्पादनाचे मशीन बनून जगत आहे. तालुक्यातील नव्या पिढीसाठी जयदत्त जायभाय आदर्श व प्रेरणादायी तरुण ठरला आहे. तेलंगणाचे पोलीस महासंचालक तथा भूमिपुत्र महेश भागवत यांची पार्श्वभूमी सुद्धा जिल्हा परिषद शाळेचीच असून त्यांनी सुद्धा नवीन अधिकारी घडविण्याचा देशात नवा विक्रम प्रस्थापित करून तालुक्याच्या वैभवात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. सध्या तालुक्यातील आठ दहा अधिकाऱ्यांनी आपल्या कर्तुत्वाने तालुक्याची ओळख राज्याला दिली आहे. त्यामध्ये जयदत्त सारख्या नव्या तरुणाची आणखी भर पडली आहे. राज्याचा गाडा सुरळीत व्हायचा असेल तर प्रत्येक प्रमुख खात्यांमध्ये एक एक तुकाराम मुंडे तयार व्हावा. लोकशाही व्यवस्थेत नेते म्हणजे कुटुंब प्रमुख समजले जातात.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

सोमवार दि.२२ जून २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## सोनईतून १३ वर्षीय मुलीचे अपहरण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : सोनई शिवारातून एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण झाल्याची गंभीर घटना समोर आली असून, या प्रकारामुळे परिसरात भीती आणि घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. मुलगी घराबाहेर पडून बेपत्ता झाल्यानंतर नातेवाईकांनी सर्वत्र शोध घेतला, मात्र ती आढळून न आल्याने अखेर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित १३ वर्षीय मुलगी दि. १९ जून रोजी सायंकाळी सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास बाथरूमला जाते असे घरातील सदस्यांना सांगून घराबाहेर पडली होती. मात्र बराच वेळ उलटूनही ती घरी परतली नाहीत. त्यामुळे कुटुंबीयांनी तिचा परिसरात तसेच नातेवाईकांकडे शोध घेण्यास सुरुवात केली. रात्री उशिरापर्यंत आणि दुसऱ्या दिवशीही शोधमोहीम राबवूनही मुलगी सापडली नाही.याप्रकरणी अपहृत मुलीच्या आजीने सोनई पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत, अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी मुलीचे अपहरण केल्याचा संशय व्यक्त केला आहे. फिर्यादीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १३७(२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल बाळासाहेब बाचकर करीत आहेत.

## प्रवरा नदीपात्रातून वाळू चोरल्याप्रकरणी चौघांविरोधात गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यातील चिंचोली येथे तालुका पोलीस पथकाने प्रवरा नदीपात्रात कारवाई करून अवैध वाळू उपसा करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला. याप्रकरणी चार जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ४९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सुमारे ६ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी पो.हे.कॉ. राहुल बबन यादव यांनी राहुरी पोलीस ठाणे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, (दि.१८) जून रोजी सायंकाळी पोलीस निरीक्षक रविंद्र देशमुख यांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, चिंचोली गावाच्या शिवारातील प्रवरा नदीपात्रात काही व्यक्ती ट्रॅक्टरला जोडलेल्या यारीच्या सहाय्याने शासकीय गौण खनिज वाळूचा अवैधरित्या उपसा करत आहेत. त्यानुसार डी.बी. पथकातील पो.स.ई. जाधव, पो.हे.कॉ. राहुल यादव, पो.हे.कॉ. सूरज गायकवाड व पो.हे.कॉ. प्रविण बागुल यांना घटनास्थळी जाऊन खातरजमा करण्याचे आदेश देण्यात आले. पोलीस पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली असता, तीन इसम ट्रॅक्टरला जोडलेल्या यारीद्वारे नदीपात्रातून वाळू बाहेर काढताना आढळून आले. पोलिसांना पाहताच संबंधित इसमांनी पळ काढण्याचा प्रयत्न केला. त्यांचा पाठलाग करून पोलिसांनी शरद बाळासाहेब भोसले (वय ३६, रा. चिंचोली) यास ताब्यात घेतले, तर अन्य दोन जण अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले. चौकशी दरम्यान शरद भोसले याने पळून गेलेल्या व्यक्तींची नावे शहादेव माने व संदिप गोपीनाथ लाटे अशी असल्याचे सांगितले. तसेच हे तिघेही दीपक बबन लाटे यांच्या सांगण्यावरून संगनमताने प्रवरा नदीपात्रातून शासकीय वाळू चोरी करत असल्याची माहिती दिली. कारवाईदरम्यान सुमारे ५ लाख ५० हजार रुपये किमतीचा स्वराज कंपनीचा ७४४ एफ.ई. ट्रॅक्टर यारीसह ७० हजार रुपये किमतीची हिरो कंपनीची मोटारसायकल (एमएच-१७ बीक्यू-७७१४) असा एकूण ६ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपी शरद बाळासाहेब भोसले, शहादेव माने, संदीप गोपीनाथ लाटे आणि दीपक बबन लाटे (सर्व रा. चिंचोली, ता. राहुरी) यांच्याविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

## कोल्हार खुर्द येथे प्रवरानदीत अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोल्हार** : राहुरी तालुक्यातील कोल्हार खुर्द येथील प्रवरानदीच्या पुलाजवळ एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला.सदरची घटना रविवारी सकाळी उघडकीस आली.या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहेत.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीवरून रविवारी सकाळी सुमारास नदीपात्राजवळ गेलेल्या काही तरुणांना पाण्यात एका पुरूषाचा मृतदेह दिसून आला.त्यांनी तात्काळ याबाबत माहिती मिळाली.माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून,अनोळखी पुरूषाचा मुतदेह रूग्णवाहिकेतून लोणी येथे पुढील कारवाईसाठी नेण्यात आला. सदरचे मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नसून अंदाजे (वय ४०) वर्षाचा असावा, प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहेत.मात्र मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार आहेत.राहुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी देवीदास कोकाटे, रवी पवार, लोणी पोलीस स्टेशनचे साळवे,गणेश अडागळे,आपत्ती व्यवस्थापन विभागाचे आपदा मित्र अनिल जाधव, जीवनदायी रुग्णवाहिकेचे निखिल भोसले तसेच स्थानिक ग्रामस्थ यांच्यामदतीने मृतदेह नदीपात्रातून बाहेर काढण्यात आला.त्याने आत्महत्या केली की? अन्य काही त्याचा घातपात झाला आहे का? असा संशय व्यक्त करण्यात येत आहेत.अधिक तपास राहुरी पोलीस करित आहेत.मात्र सायंकाळपर्यत मृतदेहाची ओळख पटलेली नसल्याचे सांगण्यात आले.

# शिर्डीतील बारा चारी भूमिगत करण्यास ग्रामस्थांचा विरोध

## मुख्याधिकाऱ्यांच्या हिटलरशाहीचा तीव्र निषेध; मोर्चा काढण्याचा इशारा

अशोक दुशिंग | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : नगरपरिषद हद्दीतील चारी नंबर १२ ही बंदीस्त करून त्यावर रस्ता करण्याचे करण्याचे नगर परिषदचे प्रयोजन आहे. येणाऱ्या कुंभमेळ्याची तयारी म्हणून सदर विकास कामे नगरपालिकेने हाती घेतले असून कामास प्रत्यक्षरित्या सुरवात करण्यात आली आहे. मात्र ज्या प्रभागातून ही चारी जाते त्या प्रभागातील ग्रामस्थांनी चारी भूमिगत करण्यास तीव्र विरोध दर्शवल्याने नगरपालिका प्रशासन व ग्रामस्थांमध्ये मोठा संघर्ष निर्माण झाला आहे. तरीही प्रशासनाने सदर काम सुरू ठेवल्याने येथील ग्रामस्थांनी नगरपरिषदेत जात निवेदन देऊन निषेध व्यक्त केला आहे.




काल सकाळी शेकडो नागरीकांनी नगर पालिकेत धाव घेत बारा चारी भूमीगत करण्याचे काम बंद करा बंद करा पाणी आमचं हक्काचे नाही कुणाच्या बापाचे अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. याविषयी तेथील नागरिकांची मते जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी सांगितले की इंग्रजांनी शिर्डीतील हा सर्वात उंचावरील भाग असल्याने या ठिकाणी पाण्याची उपलब्धता व्हावी म्हणून इंग्रजांनी ही १२ चारी निर्माण केली होती. त्या चारीच्या पाण्यामुळे प्रभाग क्रमांक सात व ११ या मधे श्रीकृष्ण नगर, प्रसाद नगर, माळीनगर, संत तुकाराम नगर, विठ्ठलवाडी आदि वस्त्यांना या चारीच्या पाण्याचा उपयोग होत असतो या भागात शेती करण्याचे प्रमाण जास्त असून सदर पाण्यामुळे हा भाग नंदनवन बनला आहे.

या भागात अनेक पेरू चिकूच्या बागा तसेच शेती बरोबर दुग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जातो. सदर चारी भूमिगत केल्यास पाण्याचा पाझर संपुष्टात येणार असल्याने हा भाग वाळवंट तयार होणार आहे. नगरपरिषद फक्त १ हजार लिटर पाणी देते त्या पाण्यात शेतकऱ्यांचे भागत नाही त्यामुळे भूमिगत चारी करण्यास येथील नागरिकांचा तीव्र विरोध असून सदर काम बंद करावे यासाठी न्यायालयात धाव घेतली आहे.

तरीही नगरपालिका प्रशासनाने नागरिकांच्या भावनांना न जुमानता हुकूमशाहीने काम सुरू ठेवल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. नगरपालिका आम्हाला १००० लिटर पाणी देत असल्याने त्या पाण्यात आमचे कुटुंबाचे भागत नाही चारीला पाणी आल्यास आमचे दोन महिने भागते त्यावर आमचे जनावर जगतात आणि दुग्ध व्यवसाय करतो चारी बुजवल्यास आम्ही उध्वस्त होणार आहोत जनावरांना तीन ते चार हजार लिटर पाणी लागते शेती आणि दूध व्यवसाय करतो त्यामुळे कोणत्या परिस्थितीत चारी बुजवू देणार नसल्याचे येथील शेतकरी प्रताप कोते म्हणाले.

बाराचारीचा विषय न्यायप्रविष्ठ असून कोर्टाचा निकाल येईपर्यंत काम थांबवावे अशी मागणी यावेळी करण्यात आली. मुख्याधिकारी सतीश दिघे हे मनमानी करून हुकूमशाही करून हिटलरशाही करत असल्याचा आरोप मुख्याधिकार्यावर केला आहे. हे काम कोणत्याही परिस्थितीत होऊ दिले जाणार नसून प्रसंगी १८ हजार ग्रामस्थांचा मोर्चा नगर परिषदेवर काढला जाईल असा इशारा ग्रामस्थ दिगंबर कोते, विनायकराव कोते, अप्पासाहेब कोते, प्रमोद कोते, अक्षय कोते, साईनाथ कोते, रावसाहेब साबळे, प्रशांत शिंदे, उत्तम सजन, दिलीप कोते, कैलास कोते, सुनील कोते, विष्णू कुलकर्णी, पोपट कोते, विजय कोते, बाबासाहेब कोते, मंगेश शिंदे, कोलगे विश्वनाथ, शुभम ताम्हाणे, कैलास तनपुरे, संजय नागरे, बाळासाहेब नागरे, अजय नागरे, बापू शिंदे, राजेंद्र लोढा, गंगाभाऊ कोते, कोते चांगदेव, गणेश शिंदे, रवींद्र एकनाथ, डॉ. कथले, डॉ. लोढा यांनी दिला आहे.

### दिघेंनी हिटलर शाही बंद करावी - आप्पासाहेब कोते

इंग्रजांनी ही १२ चारी पाण्याचा प्रश्न मिटवण्यासाठी निर्माण केली होती. सदर चारी भूमिगत झाल्यास येथील वैभव संपणार आहे. २०१७ साली निवेदन देऊन सदरचारी बंदीस्त करू नये, अशी मागणी केली होती. त्यावेळी दिघे मुख्याधिकारी होते. या ठिकाणी दिघेंची मनमानी सुरू आहे ल. दिघेंनी शिर्डीत उद्योग करण्यापेक्षा त्यांनी गोदावरी नदीवरील हार्वेस्टिंग करून पैठण पर्यंत न्यावे. दिघे यांनी शिर्डीत मनमानी चालवली आहे. दिघेंना दहा वर्षे झाली. ते शिर्डीकरांवर अधिकारशाही गाजवून अन्याय करत आहे. त्यांनी जर आमच्या भावना समजून काम बंद न ठेवल्यास तीव्र आंदोलन करणार. आमच्या भावना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व माजी खासदार डॉक्टर सुजय विखे यांच्यापर्यंत पोहोचू देत नाहीत. दिघे यांनी बदली करून न घेतल्यास अठरा हजार लोकांचा मोर्चा काढू, अशी ठोस भूमिका सोसायटीचे माजी अध्यक्ष आप्पासाहेब कोते यांनी मांडली.

# श्रीरामपूरात हातभट्टी दारू निर्मिती विक्रीवर कारवाई

## ४.६६ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : राज्य उत्पादन शुल्क विभागाने श्रीरामपूर विभागातील विविध ठिकाणी धडक कारवाई करत हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांवर मोठी कारवाई केली. ही मोहिम १२ ते २० जून २०२५ या कालावधीत श्रीरामपूर, टाकळीभान, गोंधवणी, सुतगिरणी परिसर, भैरवनाथनगर, बेलापूर, मालुंजा तसेच नेवासा तालुक्यातील विविध भागांत छापे टाकण्यात आले. या कारवाईत हातभट्टी दारू निर्मितीसाठी साठवून ठेवलेले साहित्य, रसायने तसेच अन्य साहित्य जप्त करण्यात आले. उत्पादन शुल्क विभागाने एकूण ४ लाख ६६ हजार २६० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला असून १४ गुन्हे दाखल करण्यात आले. तसेच कारवाईदरम्यान ०२ वाहने जप्त करण्यात आली आहेत.



आयुक्त राज्य उत्पादन शुल्कचे राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उपायुक्त सागर घोमकर, अधीक्षक प्रमोद सोनवणे, तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. श्रीरामपूर, राहाता व नेवासा तालुक्यांतील विविध ठिकाणी सुरू असलेल्या अवैध दारू व्यवसायावर विभागाने वचक निर्माण केला आहे. कारवाईदरम्यान महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ अंतर्गत गुन्हे नोंदविण्यात आले असून, काही आरोपींविरुद्ध चांगल्या वर्तणुकीच्या बाँडचीही कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.जप्त करण्यात आलेल्या साहित्याचा पुढील तपास उत्पादन शुल्क विभागाकडून सुरू आहेत.

उत्पादन शुल्क विभागाने अवैध मद्यनिर्मिती व तस्करीविरोधातील मोहीम यापुढेही सुरू राहणार असल्याचे स्पष्ट केले.या कारवाईमुळे अवैध हातभट्टी दारू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून कायद्याचा धाक निर्माण झाला आहेत.

## विहिरीत पडलेल्या व्यक्तीस बचाव पथकास अखेर आले यश

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**कोल्हार** : राहाता तालुक्यातील कोल्हार -बेलापूर रस्त्यावर राऊत वस्ती शिवारामध्ये शनिवारी एक व्यक्ती विहिरीत पडल्याची घटना घडली.खुशालचंद देवराम राऊत (वय ५२, रा.कोल्हार) असून यांना विहिरीतून सुखरूप बाहेर काढण्यात बचाव पथकाला यश मिळाले. या घटनेची माहिती मिळताच शिर्डी नगरपरिषद अग्निशमन विभागाचे तेजस वाणी व शुभम साठे, राहाता नगरपरिषद अग्निशमन विभागाचे ऋषिकेश सदाफळ, अशोक साठे व महेंद्र कदम, तसेच श्रीरामपूर नगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचे अनुप झरेकर, रोहित जाधव व संकेत कापसे यांनी घटनास्थळी धाव घेतली. याशिवाय ईआरटी रेस्क्यू टीम अहिल्यानगर व आपत्ती व्यवस्थापन आपदा मित्र अनिल जाधव, रामराजे गायकवाड, विनोद पडोळकर, रवींद्र पडोळकर, मनोज पडोळकर व सुनील जाधव यांनी संयुक्तपणे बचावकार्य राबविले.कोल्हार पोलीस व अग्निशमन दल व पोलीस मित्र यांनी अत्यंत कौशल्याने राबविण्यात आलेल्या रेस्क्यू ऑपरेशनमध्ये खुशालचंद राऊत यांना जिवंत व सुखरूप बाहेर काढण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी प्रवरा हॉस्पिटल, लोणी येथे रवाना करण्यात आले. या यशस्वी बचावकार्यात सहभागी सर्व पोलीस,अग्निशमन कर्मचारी व रेस्क्यू टीमच्या कार्याचे नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे.

# भंडारदरा धरणाचे पाणी कुणासाठी..?

## श्रीरामपूरला वंचित ठेवून वरच्या भागात वापर सुरुच!



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : यंदा मान्सून लांबल्याने राज्यभरातील धरणांतील उपलब्ध पाणी प्रामुख्याने पिण्यासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्यानुसार भंडारदरा-निळवंडे प्रकल्पातून सुरू असलेली सिंचन आवर्तने तातडीने थांबविण्याचे आदेशही देण्यात आले. मात्र या आदेशानंतरही भंडारदरा धरणाच्या लाभक्षेत्रातील वरच्या भागात, विशेषतः संगमनेर व राहाता परिसरात पाण्याचा वापर सुरू असल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. दुसरीकडे कालव्याच्या शेवटच्या टोकावरील श्रीरामपूर तालुक्यातील मोठा भाग पाण्यापासून वंचित राहिल्याने संतापाची लाट उसळली आहे. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, आवर्तन बंद करण्याचा निर्णय झाला तेव्हा खालच्या भागातील अनेक भरणे पूर्ण झाली होती; मात्र श्रीरामपूर तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचलेच नाही. परिणामी ऊस, चारा व इतर उन्हाळी पिकांसमोर गंभीर संकट निर्माण झाले आहे.

भंडारदरा धरण हे सुमारे ११ टीएमसी क्षमतेचे असून राहाता, कोपरगाव, श्रीरामपूर, संगमनेर व नेवासा तालुक्यांसह विस्तृत क्षेत्राला जीवनदायी ठरते. मागील वर्षांच्या तुलनेत यंदा पावसाचा मोठा खंड पडल्याने जलसाठ्यावर ताण निर्माण झाला आहे. राज्यातील एकूण धरणसाठा केवळ २५ टक्क्यांपर्यंत घसरल्याची माहिती शासनाने दिली आहे.

स्थानिक शेतकरी संघटनांच्या माहितीनुसार, संगमनेर व राहाता परिसरात कालवा आणि उपसा योजनांमार्फत पाण्याचा वापर सुरू राहिला. श्रीरामपूरच्या शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचले नाही. नेवासा भागातही काही ठिकाणी पाण्याचा वापर झाला. आवर्तन बंदीचा निर्णय सर्वांसाठी समानपणे लागू झाला का, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याबाबत अधिकृत तालुकानिहाय आकडेवारी सार्वजनिक करण्यात यावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत. भंडारदरा-निळवंडे प्रकल्पातील उपलब्ध जलसाठ्याची अधिकृत माहिती जाहीर करावी.

चालू हंगामात झालेल्या सर्व आवर्तनांची तालुकानिहाय माहिती प्रसिद्ध करावी. संगमनेर, राहाता, श्रीरामपूर व नेवासा तालुक्यातील प्रत्यक्ष पाणी वापराची आकडेवारी जाहीर करावी. शेवटच्या टोकावरील लाभधारकांना न्याय देण्यासाठी विशेष आवर्तनाचा विचार करावा. कालवा व्यवस्थापन आणि पाणी वितरणाची चौकशी करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

श्रीरामपूर तालुक्यातील शेतकऱ्यांचा प्रश्न आता केवळ सिंचनाचा राहिलेला नसून तो पाणीवाटपातील समानतेचा आणि प्रशासनाच्या उत्तरदायित्वाचा बनला आहे. भंडारदरा धरणाचे पाणी लाभक्षेत्रातील सर्व भागांना समान न्यायाने मिळते आहे का, हा प्रश्न आता अधिक तीव्रतेने पुढे येऊ लागला आहे. शिर्डी विधानसभा मतदारसंघाचे आमदार राज्याचे जलसंपदा मंत्री असल्याने ते शेजारच्या श्रीरामपूर तालुक्यातील शेतकऱ्यांना न्याय देतील का? असाही प्रश्न शेतकऱ्यांमधून उपस्थित केला जात आहे.

### अधिकारी संपर्काबाहेर

परिस्थितीबाबत माहिती घेण्यासाठी शेतकरी पाटबंधारे विभागाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करत असले तरी कार्यालयांचे लँडलाईन फोन उचलले जात नसल्याची तक्रार आहे. अनेक अधिकाऱ्यांचे मोबाईल फोन बंद अथवा प्रतिसाद न देणारे असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

### लोकप्रतिनिधींचे मौन चर्चेत

सर्वात गंभीर बाब म्हणजे श्रीरामपूर तालुक्याचे लोकप्रतिनिधी, विविध राजकीय पक्ष आणि शेतकरी संघटना यांच्याकडून या प्रश्नावर ठोस भूमिका घेतली जात नसल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये आहे. वरच्या भागात पाणी सुरू आणि शेवटच्या टोकाला कोरडेपणा अशी परिस्थिती निर्माण झाली असताना कोणताही लोकप्रतिनिधी आक्रमक भूमिका घेत नसल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे.

# नगर मनमाड महामार्गावर महिनापूर्वी बांधलेल्या पुलाला भगदाड

## महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे स्पष्ट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : नगर-मनमाड महामार्गावरील राहुरी फॅक्टरी ते राहुरी दरम्यान असलेल्या राहुरी एमआयडीसी परिसरातील नव्याने बांधण्यात आलेल्या पुलाला अवघ्या महिनाभरातच मोठे भगदाड पडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे महामार्गावरील प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, संबंधित ठेकेदाराच्या कामाच्या दर्जाबाबत नागरिकांनी गंभीर शंका उपस्थित केल्या आहेत. नगर-मनमाड महामार्गावर दिवस-रात्र मोठ्या प्रमाणावर अवजड वाहनांची वाहतूक सुरू असते. अशा परिस्थितीत नव्याने बांधलेल्या पुलाची झालेली दुरवस्था पाहता वाहनचालक व नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, अवजड वाहतुकीचा भार सहन करण्यासाठी मजबूत दर्जाचे बांधकाम अपेक्षित असताना पुलाच्या बांधकामात निकृष्ट साहित्याचा वापर करण्यात आला. पुलाच्या कामात केवळ ६ एमएम गजाचा वापर केल्याचा आरोप नागरिकांनी केला असून, या प्रकरणाची तातडीने तांत्रिक चौकशी करण्याची मागणी होत आहे. दरम्यान, राहुरी तालुक्यात तीन आमदार आणि दोन खासदार असतानाही नगर-मनमाड महामार्गाच्या कामावर पुरेसे लक्ष दिले जात नसल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. महामार्गावरील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर लोकप्रतिनिधींनी अधिक सक्रिय भूमिका घेण्याची गरज असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले. पुलाला पडलेल्या भगदाडामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असून, विशेषतः रात्रीच्या वेळी वाहनचालकांसाठी धोका अधिक वाढला आहे. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने पाहणी करून पुलाची दुरुस्ती करावी तसेच दोषी आढळणाऱ्या ठेकेदारावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

अवघ्या महिनाभरापूर्वी बांधण्यात आलेल्या पुलाला भगदाड पडल्याने नगर-मनमाड महामार्गावरील कामांच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रशासनाच्या पुढील कारवाईकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. पुलाला पडलेल्या भगदाडामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असून, विशेषतः रात्रीच्या वेळी वाहनचालकांसाठी धोका अधिक वाढला आहे. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने पाहणी करून पुलाची दुरुस्ती करावी तसेच दोषी आढळणाऱ्या ठेकेदारावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. राहुरी एमआयडीसी परिसरातील नव्याने बांधलेल्या पुलाला भगदाड पडल्याची घटना समोर आल्यानंतर अखेर संबंधित ठेकेदाराला जाग आली आहे. पुलावरील भगदाडाची माहिती समोर येताच दुरुस्तीचे काम तातडीने सुरू करण्यात आले आहे.